नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत



विदर्भ साहित्य संघाचें
मुखपत्र

युगवाणी

वर्ष सातवें — अंक दुसरा

वसंत-अंक

या अंकांत

डॉ. मा. गो. देशमुख
डॉ. शं. दा. पेंडसे
प्रा. भ. श्री. पंडित
गो. रा. दोडके
शांताराम
प्रा. गो. मो. रानडे
बापू अडावदकर
सौ. मनोरमाबाई नावलेकर
विंदा करंदीकर
प्रा. अरविंद मंगरूळकर
द. चिं. सोमण
वसंत निनावे
प्रा. य. द. भावे

☆

किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

संपादक मंडळ :

सौ. कुसुमावती देशपांडे

पु. य. देशपांडे

हरि नारायण नेने

शरच्चंद्र मुक्तिबोध

कार्यकारी संपादक :

वामन चोरघडे

पत्रव्यवहाराचा पत्ता :

" युगवाणी " कार्यालय

विदर्भ साहित्य संघ

उत्तर अंबाझरी रोड

धंतोली, नागपूर १.

अनुक्रमणिका

"कुसुमावती देशपांडे"

माधव गोपाळ देशमुख

★

' कुसुमावती देशपांडे ' हें नांव ज्याच्या डोळ्यांसमोरून एकदाहि गेलें नाही असा सुविद्य वाचक विरळा. ३ मे १९५२ पासून जबलपुरास भरणाऱ्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून गतवर्षी जेव्हा त्या निवडून आल्या तेव्हापासून विदर्भ साहित्य संघ या संस्थेस त्यांनी सर्वस्वीं वाहून घेतलें आहे—आणि ' सर्वस्वीं वाहून घेणें ' हा मराठी वाक्प्रचार इतक्या यथार्थतेने इतरत्र क्वचितच वापरला गेला असेल ! ' या व अशाच आदरार्थी नामनिर्देशांत इतरांनी त्या नांवाजवळ प्रा., सौ., बाई, वा अध्यक्ष हीं उपपदें लावलीं असतील, तीं सोडलीं तर त्यांचें सर्व लेखन ' कुसुमावती देशपांडे ' याच सुटसुटीत नांवाने प्रसिद्ध झालें आहे.

हें नांव १९२५ ते १९४५ या वीस वर्षांच्या कालावधींत मराठींत लघुनिबंध किंवा ललित लेख या नांवाने गाजलेल्या वाङ्मयप्रकाराच्या आद्य प्रणेत्यांपैकी पहिल्या पांचांत खासच येतें. किंबहुना ना. सी. फडके, वि. स. खांडेकर व अनंत काणेकर या तीनाहि पट्टीच्या लघुनिबंधकारांहून त्यांच्या ललित लेखनाची खुमारी काही वेगळीच आहे, हें त्यांचे मध्यान्ह, मध्यरात्र, चंद्रास्त असे थोडेसे ललित लेख वाचून पाहिले तरी सहजच लक्षांत येतें. दीपकळी, दीपदान व मोळी हे त्यांचे तीन ललितलेख-संग्रह प्रकाशित झाले आहेत. पुस्तकांच्या देखील नांवावर कोट्या करूं नयेत व त्यांच्या मनात तसा कांही हेतु अभिप्रेतहि नसेल. पण 'दीपकळीं'त दीपाच्या विचार-प्रकाशाचा व कळीच्या अस्फुट व टोकदार सौंदर्याचा साक्षात्कार घडतो, 'दीपदानां'त साठवून ठेवलेल्या विचारकणांच्या दीपज्योति वाङ्मयनर्मदेच्या सखोल पात्रांत दान करून सोडून दिल्यासारख्या वाटतात तर ' मोळी ' ही केवळ विचार सौंदर्याच्याच शलाकांची बांधलेली नसून लेखिकेचें कविमन आता अधिक वस्तु-निष्ठ, अधिक चिंतनशील, आणि पददलितांच्या व उपेक्षितांच्या सहानुभूतीने ओत-प्रोत भरून राहिलेलें आहे हें ' मोळी'वरून तेव्हाच कळून येतें.

त्यांच्या सर्वच ललित लेखांतील सहानुभूतिपूर्ण दृष्टिकोण, कलापूर्ण संयम, मानवतेवरील श्रद्धा, वैयक्तिक आणि सामाजिक जीवनांतील एकात्मता, तर्ककर्कश नसलेली वैचारिकता व अतिरंजित न होणारी भावनात्मकता यांचा हृद्य मिलाफ, उत्कट अनुभूति, विकसित व्यक्तित्व व प्रामाणिक आविष्कार इत्यादि अनेक वाङ्मय गुणांचें रसग्रहण अनेक टीकाकारांनी केलेलेंच आहे. खांडेकरांसारख्या त्यांच्या चाहत्यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे—" त्यांच्या कथा या जाईजुईच्या फुलां-सारख्या आहेत. त्या जशा आकाराने लहान आहेत, तसा त्यांचा सुगंधहि सौम्य आहे. त्यांच्या आकर्षकपणांत कुठल्याहि प्रकारची उग्रता नाही, भपकारा नाही, भडकपणा नाही, अतिरेक नाही. केवळ रंजनाकरिता कथा वाचणाऱ्या आणि उठल्यापासून झोपेपर्यंत, किंबहुना स्वप्नांत बहिर्मुख दृष्टीने जगाकडे पाहणाऱ्या

वाचकाला अशा गोष्टी वाचून गोंधळल्यासारखें होत असलें तर त्यांत नवल नाही. आपण ज्या वृत्तीने कविता वाचतों त्या वृत्तीने त्यांच्या कथा वाचल्या पाहिजेत; तरच त्यांचा खरा रसास्वाद आपल्याला घेतां येईल. कवितेंत व्यक्त सौंदर्यापेक्षा सूचित सौंदर्य अधिक असतें. कुसुमावतींच्या कथांचें असेंच आहे. त्या पांच मिनिटांत वाचून संपल्या तरी अंतर्मुख मनाला दीर्घकाल हुरहूर लावतात, त्याला अस्वस्थ करून सोडतात; कांही कांही वेळां त्याला विचारप्रवृत्तहि करतात. " ('साहित्य ' ऑगष्ट १९४८).

अंतर्मुख मनाला दीर्घकाल हुरहूर लावून अस्वस्थ करणें व कांही कांही वेळां त्याला विचारप्रवृत्त करणें हीं कोणत्याहि प्रभावी ललित लेखनाचीं वैशिष्ट्यें त्यांच्या कथांत स्वात्रांने आढळतात. पण त्यांहूनहि त्यांच्या लेखनाने केलेलें अधिक महत्त्वाचें कार्य म्हणजे त्यांनी मराठी वाचकांच्या सदाभिरुचीची वाढ केली हें होय. प्रकाशित झालेल्या तीनच लेखसंग्रहांचें वाचन केलेली व्यक्ति त्यांनी केलेल्या सृष्टिवर्णनाशीं समरस होईल, व्यक्तिचित्रणांत स्वतःची अनुभूति अजमावून पाहील, लेखिकेच्या सहानुभूतिपूर्ण दृष्टिकोणाशीं सद्भाव पावेल, नवविचारांनीं उद्बोधित होऊन आपल्या सहृदयतेचीं व विचारांचीं क्षितिजें अधिकाधिक व्यापक करील. परंतु या सर्व परिणामां-बरोबर त्याच्या अभिरुचीची पातळी उंच होईल हें सर्वांहून विशेष. म्हणून नये, पण आपल्या दुर्दैवाने गेल्या अर्ध शतकांतील मराठी ललित वाङ्मयांत आपटे-जोश्यांनंतर उच्च अभिरुचीला ज्यांनीं एकदाहि धक्का लावला नाही व तथाकथित ' ललित ' भाषेच्या आवरणांत आपली सदभिरुचि कधीहि खालच्या पातळीवर आणली नाहीं असे फारच थोडे लेखक निर्माण झाले. त्यांच्यांत कुसुमावती देशपांडे ह्या अग्रगण्य आहेत.

" मन हें ओढाळ गुरूं " असलें तरी गेल्या दोनतीन तपांत मराठी वाचक-वर्गावर ज्यांच्या उच्च ललित लेखनाभिरुचीचा धाक नव्हे पण एकप्रकारचा ' वचक ' वसतो, अशांपैकीं ' कुसुमावती ' या एक नामवंत लेखिका आहेत. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तित्वाची मीमांसा करणें, हें कांही मोटेसें दुर्गम नाही. जो स्वतः जसा वाचक असेल तसा लेखक बनतो; जसा विद्यार्थी असेल तसा शिक्षक बनतो व जसा श्रोता असेल तसा वक्ता बनतो. इंग्रजी, मराठी आणि संस्कृत भाषांतील त्यांचें वाचन अत्यंत पद्धतशीरपणें निवड केलेलें आहे; न वाचलेल्या ग्रंथांबद्दल त्यांच्या मनांत आजहि खऱ्या विद्यार्थ्याला असावी इतकी जिज्ञासा जागृत आहे व वाचनाप्रमाणे श्रवणाहि त्यांनी इतक्या चोखंदळपणाने केलेलें आहे की त्यांच्या लेखणीप्रमाणेच मुखावाटेहि कधी अनुचित शब्द बाहेर पडणार नाही हें अगदी गृहीत धरून चालावें !

निवडक वाचन, जागृत जिज्ञासा आणि चोखंदळ बहुश्रुतता या वेचक गुणां-मुळेच त्या उच्च श्रेणीच्या ललितलेखिका व विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका होऊं शकल्या. ललित–लेखन–द्वारा सदाभिरुचीचे अप्रत्यक्ष पाठ दिल्यानंतर आणि गेलीं वीस वर्षे नागपूर महाविद्यालयांत इंग्रजी वाङ्मयाचें वैशिष्ट्यपूर्ण व यशस्वी अध्यापन केल्यानंतर गेलीं कांही वर्षे त्या संयोजनात्मक ललितलेखन-कलेबरोबरच पृथक्करणात्मक टीकावाङ्मयाकडे वळूं लागल्या आहेत, हें मराठी टीकावाङ्मयाचें सुदैव समजलें पाहिजे. ' पासंग ' या अर्थसूचक नांवाचा त्यांचा

टीकालेखसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर असून त्यांत समाविष्ट केलेले ' आम्ही कोण ? '–सारखे कांही टीकालेख त्यांतील मर्मग्राहक विवेचनामुळें आधीच चिकित्सक वाचकांचे आकर्षण-विषय झाले आहेत. केशवसुतांचें ' आम्ही कोण ? ' हें मुनीत केवळ काव्यपर आहे ही समजूत अनेक टीकाकारांनी व विवेचनकारांनी प्रचलित करून ठेवली होती. परंतु या कवितेचें हार्द उकलून दाखवितांना कुसुमावतींनी जी नवी दृष्टि व सूक्ष्म विवेचकता दाखविली आहे त्यांमुळे केशवसुतांच्या प्रतिभाविषयक दृष्टिकोणावर ह्या टीकालेखाने नवाच प्रकाश टाकला आहे. ' शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या वरें ?' या पंक्तींतील ' सुरांच्या ' म्हणजे ' देवांच्या ' हाच सरलार्थ आजवरच्या टीकाकारांनी केला. परंतु कवितेंतील अंतर्गत आशयाला व संदर्भाला सुरांच्या म्हणजे ' स्वरांच्या ' हा अर्थ कसा अनुकूल होतो व त्यामुळे संगीत कलावंतांच्या थोरवीवर व एकंदर कवितेच्या प्रतिभावंतपर मथितार्थावर कसा नवा प्रकाश पडतो हें मुळांतूनच वाचलें पाहिजे.

विदर्भ साहित्य संघासारख्या कार्यव्यापी संस्थेच्या दैनंदिन नित्यनैमित्तिक कृत्यांत गेलें वर्षभर त्या व्यग्र होत्या. त्यामुळे ' पासंग ' हा संग्रह बाहेर येऊं शकला नाही. त्याचप्रमाणे वामन–मल्हार–जोशी स्मारक ग्रंथमालेंतून प्रसिद्ध होऊं घातलेला त्यांचा मराठी कादंबरीच्या एका शतकाचा टीकात्मक इतिहास हाहि बराचसा छापून झाला असूनहि पूर्णपणें प्रकाशित होऊं शकला नाही. काव्यटीकेच्या बाबतींतलें त्यांचेंच आधींचें अल्प पण बहुमोल कार्य हें देखील कादंबरीच्या सखोल आणि विस्तृत अभ्यासामुळे कांहींसें मागे पडेल, एवढें या प्रमाणग्रंथाचें महाराष्ट्र स्वागत करील, यांत शंका वाटत नाही. आंग्लवाङ्मयाच्या संनिकर्षानें मराठींत जे नवे वाङ्मयप्रकार प्रचलित झाले त्यांत कादंबरी हा अग्रस्थानीं असून गेल्या शंभर वर्षांतील तिच्या प्रगतीचा विवेचक आढावा घेण्यास कुसुमावती देशपांडे या सर्वतोपरि सक्षम लेखिका आहेत असें त्यांच्या आजवरच्या टीकालेखांवरून कुणाहि विचारी वाचकाचें मत बनतें. त्यांचा जवळजवळ संपूर्ण ग्रंथ वाचण्याची प्रस्तुत लेखकाला संधि मिळाली असल्यामुळे व लेखनसमयीं त्यांनी मराठींतलि जुनी—नवी प्रत्येक कादंबरी साक्षेपाने मिळवून कशी वाचून काढली, किती लोकांशीं पत्रव्यवहार केला व आपलें प्रत्येक विधान निकटवर्तीयांशीं चर्चून कसें पारखून घेतलें याचीहि कल्पना आलेली असल्यामुळे त्यांचा ग्रंथ कादंबरीविषयक बऱ्याच रूढ कल्पनांना धक्के देऊन दूर सारणारा व नवविचारप्रवर्तक होईल याबद्दल शंका वाटत नाही. हरि नारायण आपटे, वा. म. जोशी व डॉ. केतकर या दिवंगत कादंबरीकारांवरील त्यांचें विवेचन तर मौलिक आहेच. परंतु लोकप्रिय अशा समकालीन कादंबरीकारांच्या कृतींचें विश्लेषण करण्याचें नाजूक कामहि त्यांनी अत्यंत कुशलतेने केलें आहे. कादंबरीच्या मूलभूत निकषांवर त्यांची पकड किती घट्ट आहे याचा मराठी वाचकांना प्रत्यय येईल व आपली अभिरुचि तपासून घ्यावी लागल्यामुळे सुबुद्ध वाचक व त्यांचे परमप्रिय कादंबरीकार बेचैन होतील, असा खळबळ उत्पन्न करणारा हा ग्रंथ ठरेल, एवढेंच येथे लिहिणें पुरे.

ललित आणि टीकालेखनाच्या क्षेत्रांत मराठी साहित्यावर त्यांनी जें नवें तेज चढविलें आहे याचें मुख्य कारण त्यांचा डोळस व्यासंग, कणखर ध्येयनिष्ठा, उच्च अभिरुचि, व्यापक सहानुभूति, बुद्धि व भावना यांच्या आधारें समतोल चालण्याची सवय आणि स्वतःच्या कर्तृत्वाविषयी योग्य तेवढाच आत्मविश्वास या गुणांचा

संयोग हें होय व यांच गुणांचा आढळ त्यांच्या वाङ्मयांत व जीवनांतहि होतो. मुंबई साहित्यसंमेलनाच्या टीकाविभागाच्या शाखासंमेलनाचें अध्यक्षपद त्यांनी भूषणास्पद रीतीने चालवून दाखविलें. परंतु केवळ रसव्यवस्था, वैदर्भी रीति इत्यादि प्राचीन संशोधनात्मक विषयांसंबंधीं त्यांना योग्य तें कुतूहल असूनहि आपणहि त्यांत कांही कार्यभाग घ्यावा असें इतरांनी सुचविलें तरी चुकूनहि त्या तिकडे वळणार नाहीत. कॉलेजमध्ये त्यांनी चॉसरपासून शॉपर्यंत आणि पोप-ड्रायडन पासून शेली–वर्डस्वर्थपर्यंतच्या सर्वांच्या कृति शिकविल्या असल्या आणि शेक्स्पियर वरच्या त्या एक अधिकारी अध्यापक असूनहि इंग्रजी ग्रंथांवर मराठींत कांही परिचयात्मक लिहावें असें त्यांच्या मनांतहि येत नाही. उलट क्लासिसिझ्म् व रोमांटिसिझ्म् यांची इंग्रजींत जशीं वर खालीं अशीं आंदोलनें दिसतात तसा मराठी काव्यप्रांतांत वा इतर ललितवाङ्मयक्षेत्रांत कांही आलेख काढतां येईल काय हा विचार त्यांच्या मनांत नेहमी येतो. Subjective आणि Objective या घोटाळयांत पाडणाऱ्या दोन संज्ञांतील मर्यादा निश्चित करण्यासाठी त्या इंग्रजी काव्यांतील अत्यंत समर्पक उदाहरणें देतील व मराठींत त्यांना निश्चितार्थ व्यक्त करणारे प्रतिशब्द वापरतील पण तरीहि इंग्रजी काव्याला जशी क्लासिक्–रोमांटिक्ची परिभाषा योग्य वाटते तशी ती मराठीला कितपत मानवेल किंवा आत्मनिष्ठ–वस्तुनिष्ठ ही तत्त्वज्ञानाची परिभाषा टीकाप्रांतात थोडीशी सैल म्हणजे अन्योन्य व्याप्त होतेच याचीहि जाणीव त्या कधी विसरणार नाहीत. डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांविषयी बोलतांना इतर प्रसिद्ध कादंबरीकारांच्या मानाने त्यांचेच व्यक्तिचित्रण कसें अधिक जिवंत वाटतें हें मोठ्या जोषाने व उत्साहाने सांगतील. डॉ. केतकरांच्या समाजशास्त्रीय विचारांचें गुणग्रहण करतांच त्यांनी केलेलें स्वभाव रेखाटन देखील कसें कलापूर्ण झालें आहे हें नव्याने पटवून देतील. आपण चिंतनपूर्वक ठरविलेल्या निकषांवर माडखोलकरांच्या कादंबऱ्यांची कठोर चिकित्सा त्या करतील, पण त्याचवेळीं अंतरंगाहून भाषाशैलीची कांही मातबरी नाही हें मान्य करूनहि त्यांच्या 'चंदनवाडी' बद्दल योग्य ती गुणग्राहकता व भाषाप्रभुत्वाबद्दल अंतःकरणपूर्वक आदर व्यक्त करितील. संयम, सदाभिरुचि व सहृदयता हेच त्यांच्या कलेचे व टीकेचे स्थायीभाव आहेत.

रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर आणि लक्ष्मीबाई टिळक यांच्या नंतरच्या नामवंत मराठी लेखिकांत त्यांचा पहिला क्रमांक लागतो. मात्र या त्रयीहून त्यांच्या शैलीचें व विचारसरणीचें स्वरूप मूलतःच वेगळें आहे, याची इतरांप्रमाणे त्यांनाहि जाणीव आहे. कृष्णाबाई मोटे, विभावरी शिरूरकर, डॉ. इरावती कर्वे, गीताबाई साने, सुलभा पाणंदीकर, कमलाबाई टिळक, मुक्ताबाई दीक्षित या समकालीन लेखिकांच्या विषयी डोळस आपलेपणा दाखवितील. पण त्याबरोबरच स्त्रियांचें असें पुरुषांपेक्षा कांही वेगळें व्यक्तित्व निदान वाङ्मयांत तरी असूं नये असें कोणी म्हणतांच त्यांच्या चेहऱ्यावर अंतर्मुख छटा दिसतील व "एका काळीं माझ्याच तोंडून असें विधान निघालें असतें व या उलट मताला मीच हिरिरीने विरोध केला असता. पण हरिभाऊ आपट्यांनी स्त्रियांचें जिव्हाळयाने केलेलें चित्रण लक्षांत घेऊनहि त्यांत पुरुषप्रधान दृष्टीच दिसते व स्त्रांचें व्यक्तित्व वाङ्मयांतहि कांही वेगळेंच असतें" असें सकृद्दर्शनीं प्रतिगामी भासणारें पण अत्यंत विचारपूर्वक बनलेलें मत निश्चयाने मांडून दाखवितील.

विदर्भ साहित्य संघाच्या अनेकविध कार्यक्षेत्रांत त्यांनी जो कांहीसा अनपेक्षित परंतु सर्वस्वाने कामांचा वाटा उचलला त्यावरून त्यांच्या कौटुंबिक व वाङ्मयीन संसारांतील नीटनेटकेपणाची छाप त्यांच्या संस्थाचालनांतूनहि दिसून आली. संस्थेच्या वाढत्या व्यापाबरोबर तिची दैनंदिन कार्यवाही, पत्रव्यवहार व आनुषंगिक कार्येंहि फार वाढलीं. विशेषेंकरून उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी वाढल्या. त्या सर्वांची सुसूत्र व्यवस्था लागून संस्थेचा कारभार त्यांच्या कारकिर्दींत अधिक तडफदार व चोख झाला संस्थेला लोहकुटींत कां होईना पण स्वतःचें असें कार्यालय मिळालें व त्यांत कचेरीच्या व्यवस्थेबरोबरच छोटे मोठे साहित्यविषयक कार्यक्रम साजरे झाले. मतें आणि मतभेद लक्षांत घेऊनहि "एकमेकां साह्य करूं" हा संस्थाचालनाचा मूलमंत्र दृष्टीआड न करतां त्यांनी अनेक लहान थोर साहित्यिक कार्यकर्त्यांस लोहकुटींत एकत्र येण्यास प्रवृत्त केलें. हें श्रेय त्यांना व त्यांच्या नव्या-जुन्या सहकाऱ्यांस द्यावयास हवें. विदर्भ साहित्य संघांतील डॉ. य. खु. देशपांडे, प्रा. बनहट्टी, श्री. पु. य. देशपांडे, डॉ. कोलते, श्री. माडखोलकर या पूर्वाध्यक्षांना व प्रा. नेने, प्रा. वामनराव चोरघडे, श्री. आ. रा. देशपांडे, श्री. जोग, न्यायमूर्ति मंगळमूर्ति, श्री. ढवळे, श्री. पटवर्धन प्रभृति भिन्न भिन्न कार्यक्षेत्रांतील नव्या-जुन्या कार्यकर्त्यांना वेगवेगळ्या कार्यांचा यथोचित भाग उचलण्यासाठी संस्थेंत निकोप वातावरण निर्माण केलें. त्याचप्रमाणे संस्थेचे आद्य संस्थापक कविभूषण बळवंतराव खापर्डे यांच्यापासून तों प्रा. बनहट्टी, वामनराव देशपांडे, कै. ना. कृ. दिवाणजी व काका सहस्रबुद्धे यांच्यापर्यंत अनेक कार्यकर्त्यांनी जिवापाड मेहनत करून विदर्भ साहित्य संघाला नांवारूपाला आणलें त्यांच्या परिश्रमांची बूज राखली व प्राचीन परंपरा अधिक उज्ज्वल केली. या बाबतींत अनेक कार्यकर्त्यांबरोबरच विशेषेंकरून सरचिटणीस श्री. भाऊसाहेब माडखोलकर व परीक्षा-समितीचे संचालक डॉ. वि. भि. कोलते यांच्याशीं सहकार्याच्या भावनेने वागून संघाला प्रगतीच्या सुपंथावर नेण्यास आपल्या अध्यक्षीय कारकिर्दींत कुसुमावतींनी जिव्हाळ्याने सहयोग दिला ही गोष्ट संस्थेच्या इतिहासांत मोठ्या गौरवाने नमूद केली जाईल.

जवळपूरच्या आगामी संमेलनाच्या अधिवेशनांतहि त्यांच्याकडून विशेष अपेक्षा आहेत. त्यांचें अध्यक्षीय भाषण मराठी टीकाक्षेत्रांतील एक महनीय टप्पा ठरेल व साहित्य-समालोचनासंबंधीं त्यांत अधिकारवाणीने मार्गदर्शन केलेलें आढळेल. नव्या वर्षासाठी महाराष्ट्रांतील सुविख्यात वक्ते, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे मर्मज्ञ आणि ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानावर विद्वन्मान्य व प्रमाणभूत प्रबंध लिहिणारे प्राध्यापक डॉ. शंकर दामोदर पेंडसे यांची अध्यक्षपदीं प्रचंड बहुमताने निवड झाली आहे. आता विदर्भ साहित्य संघाची प्रतिष्ठा विदर्भाबाहेरील महाराष्ट्रांतहि अधिक प्रमाणांत वाढेल व महाराष्ट्रांतील विभागशः कार्य करणाऱ्या साहित्यसंस्थांना त्यांच्या कारकिर्दींत संधायक स्वरूप देण्याबाबत विदर्भ साहित्य संघाकडून अधिक प्रमाणांत चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.

कुसुमावती देशपांडे या नव्या कार्यकारी मंडळांतहि निवडून आल्या असून संस्थेच्या वाढत्या जमाखर्चाची त्यांनी जी व्यवस्थित घडी बसवून दिली ती तशीच राहावी म्हणून इतर कोणतेहि पदाधिकार न स्वीकारतां त्यांनी स्वतःकडे कोषाध्यक्षपद घेतलें आहे; तें त्यांच्या नीटनेटक्या कार्यपद्धतीला पोषक व संस्थेच्या अंतर्गत व्यव-

स्थेला उपकारक ठरेल हें निःसंशय. कोषव्यवस्थेबरोबरच संघाच्या इतर अनेक कार्यक्षेत्रांतहि त्यांचें सहकार्य लाभेल. विशेषतः नागपूरमधील विविध साहित्य-संस्थांच्या सहयोगाचे कार्यक्रम त्यांच्या नेतृत्वाखालील समितीने यंदा सुरू केले तेहि कार्य पुढील वर्षी अधिक जोमाने चालतील व त्यांनी एकाच वर्षाच्या अवधींत संघाच्या निरनिराळ्या कार्यक्षेत्रांत, लहानसहान गोष्टीदेखील शिस्तशीरपणें करण्याच्या आपल्या स्वभावविशेषाचा जो ठसा उमटविला आहे तो पुढेहि तसाच टिकेल. संघापुढे असलेल्या बहुविध योजनांना मूर्त स्वरूप देऊन सुफलित करण्यांत त्यांचा यापुडेहि फार महत्त्वपूर्ण हिस्सा राहील हीच अपेक्षा.

मराठींतील ललित व टीकात्मक साहित्याच्या आणि विदर्भ साहित्य संघाच्या एक अनन्यसाधारण उपासिका प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या वैशिष्ट्यपूर्ण व प्रभावशाली व्यक्तित्वामुळे त्यांच्या अध्यक्षतेखाली भरणारें जबलपूरचें वि. सा. संमेलन अत्यंत यशस्वी रीतीने पार पडो असें मनःपूर्वक अभीष्टचिंतन करून हा त्रोटक परिचय संपवितों.

अभ्यास-मंडळें

शं. दा. पेंडसे

★

मराठी भाषा आणि वाङ्मय यांचें संरक्षण व संवर्धन करण्याचें महत्त्वाचें कार्य विदर्भ साहित्य संघाला करावयाचें आहे. या कार्यांत सहभागी होण्याची उत्सुकता प्रांतांतील अनेक तरुण कार्यकर्त्यांमध्ये उत्पन्न झालेली दिसते. अभ्यासपूर्ण असें शास्त्रीय वाङ्मय निर्माण करून किंवा प्रतिभासंपन्न असें ललित वाङ्मय निर्माण करून, मराठी वाङ्मयाचें संवर्धन तरुण कार्यकर्ते करूं शकतील. जुन्या वाङ्मयाचें संशोधन व शुद्धीकरण हाहि एक अभ्यासाचा विषय आहे. महानुभावीय वाङ्मयाचें दालन समृद्ध करण्याचा मान, डॉ. य. खु. देशपांडे, श्री. वामनराव देशपांडे, श्री. हरिभाऊ नेनें आणि डॉ. कोलते यांनी आपल्या प्रांताला मिळवून दिला आहे. त्यांच्या मार्गदर्शित्वाखाली या वाङ्मयाचें संशोधन व अभ्यास पुढे चालू ठेवणाऱ्या तरुणांचें एक अभ्यासमंडळ स्थापन झालें पाहिजे. महानुभावीय वाङ्मय ज्या विविध सांकेतिक लिपींत लिहिलें गेलें आहे त्या लिपींचा अभ्यास करून, अद्यापि अप्रसिद्ध परंतु वाङ्मयाच्या व भाषेच्या दृष्टीने प्रसिद्ध करण्यास योग्य अशा महानुभावीय ग्रंथांचें प्रचलित लिपींत लेखन करून त्यांचें संपादन या मंडळाला करितां येईल.

दुसऱ्या एका मंडळाने ज्ञानेश्वरीच्या नव्या जुन्या सर्व उपलब्ध, लेखी व मुद्रित प्रति गोळा करून एक पाठशुद्ध प्रत सिद्ध करण्याचें काम अंगावर घेतलें पाहिजे. महाभारताची पाठशुद्ध प्रत प्रसिद्ध करण्याचें कार्य आज अनेक वर्षें पुण्यास भांडारकर-संशोधन-मंडळाने चालविलें आहे. तितकें मोठें नसलें तरी तशाच स्वरूपाचें ज्ञानेश्वरीची पाठशुद्ध प्रत प्रसिद्ध करण्याचें कार्य आहे. ज्ञानेश्वरींतील अक्षरशः हजारों पाठभेदांची चर्चा करून ज्ञानेश्वरकालीन भाषेच्या दृष्टीने त्यांतील मूळ शुद्ध पाठ कोणता याचा निर्णय या मंडळाला करावा लागेल. डॉ. हर्षे यांनी ज्ञानेश्वरीचा पहिला अध्याय अशा रीतीने संपादिला आहे.

हें कार्य करीत असतां वरील दोन्ही मंडळांना चक्रधर–ज्ञानेश्वर काळीं प्रचलित असलेले पण आज भाषेंतून लुप्त झालेले हजारों अपरिचित मराठी शब्द आढळतील. या शब्दांचा संग्रह आणि व्युत्पत्तिसहित अर्थनिश्चिति करून, त्यांतील आजहि रूढ होण्यासारखे शब्द कोणते आहेत तें पाहिलें पाहिजे. या शब्दसंग्रहांत कितीतरी सोपे, सुटसुटीत, सुंदर व अर्थवाहक शब्द सांपडतील व ते रूढ केल्याने मराठी भाषा अधिक संपन्न होईल.

वाङ्मयविषयक या दोन कार्यांशिवाय भाषाविषयक आणखी एक कार्य तरुण कार्यकर्त्यांची वाट पहात आहे. तें कार्य म्हणजे बस्तरसंस्थानांतील हळबी भाषेचें संशोधन हें होय. भाषा विषयांतील आठ दहा तरुण पदवीधरांनी बस्तरच्या प्रदेशांत निरनिराळ्या विभागांत महिनाभर फिरून तेथील भाषेचे हजारों नमुने गोळा करून येथे आणले पाहिजेत. त्यांचें भाषाशास्त्राच्या दृष्टीने परीक्षण करून बस्तर संस्थानांतील हळबी भाषेवर मराठी, छत्तिसगडी किंवा उरिया या भाषांपैकी कोणत्या भाषेचा अधिक परिणाम झाला आहे व यांपैकी कोणत्या भाषेची ती पोटभाषा आहे हें ठरविलें पाहिजे.

उपरिनिर्दिष्ट चक्रधर–मंडळ, ज्ञानेश्वर–मंडळ, व हळबी–भाषा–मंडळ यांपैकी एक किंवा अधिक मंडळें अस्तित्वांत येणें हें तरुण कार्यकर्त्यांच्या संख्येवर आणि आवडीवर अवलंबून आहे. त्यांचें कार्य वर्ष–सहा महिन्यांत संपण्यासारखें नाही. पुरेसे योग्य कार्यकर्ते मिळाले तर त्यांना अवश्य ती साधनसामग्री उपलब्ध करून देण्याच्या कामीं विदर्भ साहित्य संघ शक्य तें सर्व साहाय्य करील असा विश्वास वाटतो.

वि. सा. संघाच्या सदस्यांना आग्रहाची विनंती

विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सदस्यांना अशी नम्र विनंती आहे की आपल्या सदस्यत्वाच्या वर्गणीची रकम म. ऑर्डरीने पाठवितांना त्यांनी कुपनवर (१) आपलें संपूर्ण नांव आणि पत्ता (२) जुने सदस्य असल्यास क्रमांक आणि (३) नवीन सदस्य होणें असल्यास तसा स्पष्ट उल्लेख करण्याची दक्षता घ्यावी. अशाच प्रकारची दक्षता कार्यालयांत वर्गणी आणून देणाऱ्या सदस्यांनीहि घ्यावी. अशा तऱ्हेची दक्षता घेतल्याने पावत्या आणि युगवाणीचे अंक सदस्यांकडे पाठविणें सोपें जाईल. वरील गोष्टींच्या अभावी सध्या पावत्या आणि अंक पाठविणें कठीण झालें आहे म्हणून ही विनंती मुद्दाम करण्यात येत आहे.

रा. पु. सगदेव
चिटणीस

अनुक्रमणिका

महाकोसलांतील महाराष्ट्रीयांची साहित्यसेवा

भवानीशंकर श्रीधर पंडित

★

जबलपुरास भरत असलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या निमित्ताने या छोटे-खानी लेखांत मी महाकोसलांतील नव्या जुन्या महाराष्ट्रीय साहित्यसेवकांच्या कामगिरीची माहिती संकलित करण्याचा यथाशक्ति प्रयत्न करीत आहें. वास्तव्य, शिक्षण अथवा उदरंभरण यांपैकी कोणत्याहि निमित्ताने महाकोसलाशी माझा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध आलेला नाही. तेव्हा तेथील साहित्यसेवकांच्या साहित्य-सेवेची यथासांग माहिती मला अधिकारवाणीने सांगतां येणार नाही. परंतु महाकोस-लांतील माझ्या परिचितांकडून मला जी अधुरी अपुरी माहिती मिळाली आहे अथवा, या दिशेने पाऊल टाकीत असतांना माहितीचे जे दोन चार कण माझ्या हाती आले आहेत, तेच मी जिज्ञासु वाचकांसमोर जुळविण्याचा प्रयत्न करीत आहें.

महाकोसलाशी महाराष्ट्रियांचा संबंध इ. स. १७२९ च्या उन्हाळयापासून जुळला आहे. याच वर्षी पहिल्या बाजीरावसाहेब पेशव्यांनी अलाहाबादेचा सुभेदार महम्मद बंगश यास परास्त केलें. बुंदेलखंडच्या छत्रसालास बंगशाचा फार उपद्रव होत होता. तेव्हा त्याने पुण्यास बाजीरावांना एक काव्यमय पत्र पाठवून आपल्या साहाय्यास येण्याची विनंती केली. या काव्यपत्रांत गजेंद्राच्या पुराणकथेचा संदर्भ असल्यामुळे तें अतिशय सूचक व सुंदर झालें आहे. त्या पत्रांतील एक सुप्रसिद्ध दोहा असा:—

‘ जो बीती गजग्राहपर सो बीती है आय
बाजी जात बुँदेलकी राखो बाजी राय ’

पुण्याहून जैतपूरचें अंतर दीड महिन्याचें आहे. परंतु आपल्या ६० हजार फौजेनिशी बाजीरावांनी तें अवघ्या १७ दिवसांत तोडलें. गजेंद्राने धांवा करतांच भगवान विष्णु जाण्यास निघाले. त्यांच्या बरोबर निघण्याची तयारी देवी लक्ष्मी करूं लागली. गरुड आपले पंख पसरून त्यांना नेण्यासाठीं सिद्ध होऊं लागला. पण विष्णु त्या अगोदरच गजेंद्राजवळ जाऊन पोचले. पुराणकथेंतील हीच त्वरितता बाजीरावांनी आपल्या चढाईंत दाखविली. त्या प्रसंगास उद्देशून पुढील दोहा प्रसिद्ध आहे:—

‘हां हां हां’ लछमी कहै ‘हूँ’ कहै गजराज
पहले गोली छुटत है, पीछे होत अवाज’

छत्रसालांच्या कृतज्ञतेला बाजीरावांच्या या शूर साहाय्याचें विस्मरण झालें नाही. त्यांनी बाजीरावांस पुत्रवत् मानून आपल्या राज्याच्या एका विभागाचे वारस

केलें. बाजीरावांनी आपल्या वांट्याचे तीन भाग करून गोविंद बल्लाळ खेर यांस सागर, जालवण व हीराखाण यांवर, हरि विठ्ठल डिंगणकर यांस काल्पी, हमीरपूर व कांही परगणे यांवर आणि कृष्णाजी अनंत तांबे यांस बांदा व हमीरपुरांतील उरलेले परगणे यांवर कारभारी नेमलें. पुढे डिंगणकर व तांबे यांत गृहकलह सुरू झाला. तेव्हा हा एकंदर कारभार खेरांवर सोपविण्यांत आला. तेच पुढे इतिहासांत गोविंदपंत बुंदेले या नांवाने विख्यात झाले. बुंदेले हे कऱ्हाडे ब्राह्मण. तेव्हा त्यांच्या बरोबर त्यांच्या ज्ञातीचीं अनेक कुटुंबें कोंकणांतून बुंदेलखंडांत येऊन सागर, दमोह, जालवण, झांशी, पथरिया, बांदा इत्यादि ठिकाणीं स्थायिक झालीं. यांनीच महाकोसलांतील मराठी साहित्याचा पाया घातला.

सागरचे बुंदेले हे "मराठे ब्राह्मण राजे" खरे. परंतु त्यांचें राज्य हिंदी भाषी मुलुखावर असल्यामुळे त्यांनी मराठी भाषा व साहित्य यांबरोबरच हिंदी भाषा व साहित्य यांचाहि पुरस्कार केला. एकच नागरी लिपी असणाऱ्या हिंदी व मराठी या भाषाभगिनींचा आपल्या या मध्यप्रांतांत गेल्या सव्वा दोनशे वर्षांपासून निकट संबंध आहे. या प्रांतांतील महाराष्ट्रीय लेखकांनी हिंदी साहित्यांत भर घातली असून हिंदी साहित्यिकांनी आपल्या साहित्यलेखनांत मराठीची मदत घेतली आहे. तेव्हा येथे तत्संबंधाचा निर्देश अस्थानी व अनुचित होणार नाही अशी अपेक्षा आहे. मात्र हा इतिहास आवश्यक साधनांच्या अभावी क्रमबद्ध देता येणें शक्य नाही.

जुन्यांतली जुनी माहिती जमेस धरल्यास सागरच्या राजांच्या पदरी असणाऱ्या दोघां हिंदी कवींचीं नांवें उपलब्ध आहेत. हिंदी साहित्याच्या रीतिकालांतील एक प्रमुख कवि पद्माकर कांही दिवस गोविंदपंत बुंदेल्यांचे पौत्र रघुनाथराव उर्फ आबा साहेब यांच्या आश्रयास होते ;—

'दाहन तैं दूनी तेज तिगुनी त्रिशूलन तै
चिल्लिन तैं चौगुनी च लोंक चक्रपाली तैं
कहै पदमाकर महीप रघुनाथराव
ऐसी समसेर शेर–शत्रुनपै घाली तैं'

या शब्दांत त्यांनी त्यांच्या शौर्याची व वीर्याची स्तुति केली आहे. गोविंद पंतांचे प्रपौत्र बालाजी गोविंद यांच्या आश्रयास राजाराम नांवाचे कवि होते. ते आपल्या आश्रयदात्याविषयी म्हणतात;—

'राजाराम कहै सदा बेद ज्यों बिधाननमें
कुबेर धनमाननमें दूसरो न ताजा है
उदित उदार महाराज वीर बालाराज
राजनमें राजा दुजराजनमें राजा है'

सागरच्या खेरांच्या राजवटींतच जालवणकर महाराज हे सत्पुरुष उदयास आले आणि पथरिया येथे करकरे या उपनांवाच्या कवींनी गजगौरी व्रत, वीरमणी कथा इत्यादि आपलीं मराठी कथाकाव्यें रचलीं. हीं काव्यें कै. वामन दाजी ओक यांनी काव्यसंग्रहांत प्रसिद्ध केलीं आहेत. करकऱ्यांनी 'राघव' या काव्यमय नांवाने कविता लिहिली आहे आणि आख्यानांत दोहा, सोरठा, कवित्त, सवैय्या आदि हिंदी छंदांचा आणि हिंदी भाषेचा सर्रास उपयोग केला आहे. महाकोसलांत जुन्या जमा-

न्यांत लिहिल्या गेलेल्या मराठी साहित्याचें संशोधन अजून व्हावयाचें आहे. तें त्या भागांतील अभ्यासूंनी हातीं घेणें आवश्यक आहे.

बुंदेलखंडच्या खेरांचा कारभारी या नात्यानें पुण्याच्या पेशवे दरबाराशीं संबंध होता. परंतु इ. स. १८१८ सालीं खडकीच्या लढाईत पेशव्यांचा आणि सीताबर्डीच्या लढाईत शेजारच्या नागपूरकर भोंसल्यांचा पराभव होतांच खेरांनीं इंग्रजांशीं स्वतंत्र तह केला. या तहाप्रमाणे खेरांना इंग्रजांकडून वार्षिक २॥ लाख रुपये पेन्शन मिळत होतें. रघुनाथराव आबासाहेब खेरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या विधवा पत्नीनें बळवंतराव ऊर्फ बाबासाहेब हा दत्तक घेतला होता. परंतु इंग्रजांनीं खेरांचा सारा मुलुख बळकावला आणि दत्तकास रुपये ५००० सालीना पेन्शन देऊन जबलपुरास नेऊन ठेवलें. यांच्या घराण्यास हल्ली जबलपुरास "सागरवाले राजे" असें नांव आहे. यांच्या बरोबर अनेक कुटुंबें सागर सोडून जबलपुरास आलीं आणि सागराऐवजी जबलपूर नवीन विद्येचें व साहित्याचें केंद्र बनलें.

इंग्रजांच्या नव्या आमदानींत इंग्रजी भाषा व साहित्य यांच्या अभ्यासास महत्त्व आलें. इंग्रज राज्यकर्त्यांनीं या प्रदेशांत आपली शिक्षणप्रणालि सुरू केली. तिच्यांत भाग घेण्यांत महाराष्ट्रीय मंडळी आघाडीवर होती. जबलपूरचें आजचें रॉबर्टसन् कॉलेज मध्यप्रांतांतलें सर्वांत जुनें शिक्षणाचें केंद्र असून त्याचा इतिहास इ. स. १८३६ सालापर्यंत मागे जाऊन पोंचतो. या वर्षी "सागरच्या मराठी पंडितांनीं" आपल्या मुलांबाळांच्या शिक्षणासाठीं ज्यांत कलकत्ता विद्यापीठाचे इंटरपर्यंतचे वर्ग आहेत असें एक सरकारी विद्यालय स्थापन केलें होतें. पुढे इ.स. १८६० सालीं तें जबलपुरास नेण्यांत आलें. इ. स. १८८० सालीं कलकत्ता विद्यापीठाचे बी. ए. व एल्एल्. बी पर्यंतचे वर्ग त्यांत उघडण्यांत आले आणि अगदी अलिकडे म्हणजे इ. स. १९१६ सालीं त्याला रॉबर्टसन् कॉलेज हें नांव देण्यांत आलें. या कॉलेजांत शिक्षण घेणाऱ्या महाराष्ट्रियांनीं महाकोसलांतील साहित्याच्या नवीन पर्वास प्रारंभ केला.

महाकोसलांतील प्रारंभींचीं हिंदी क्रमिक पुस्तकें कै. बळवंतराव पेंढारकर यांनीं लिहिलीं होतीं. विज्ञानाचीं पाठ्यपुस्तकें त्या विषयाचे प्राध्यापक कै. गोळे यांनीं लिहिलीं होतीं. पुस्तकें हिंदींत असलीं, तरी त्यांचे लेखक महाराष्ट्रीय असल्यामुळे त्यांवर मराठीची छाप आहे. हा खरा इतिहास लक्षांत घेऊनच हिंदी भाषेचे व्याकरणाचार्य कै. कामताप्रसाद गुरू यांनीं आपल्या ग्रंथांत मराठी भाषेचा व व्याकरणाचा विचार केला आहे. या प्रदेशांतील हिंदी व मराठी भाषांचे गाढ संबंध लक्षांत घेऊनच छंदप्रभाकर या अमोलिक ग्रंथाचे विद्वान् व व्यासंगी लेखक कै. जगन्नाथ-प्रसाद 'भानु' यांनीं आपल्या ग्रंथांत ओंवी, अभंग, दिंडी, पवाडा, मरहटा इत्यादि प्राचीन छंदांचा परामर्श घेतला आहे.

जबलपूरचे आधुनिक काळांतील आरंभींचे साहित्य सेवक म्हणून कै. घंटय्या नायडूंचें नांव प्रथम घ्यावें लागेल. पद्यरचनेच्या बाबतींत कुंटे व चिंतामणी पेटकर यांना जी सुधारणा करण्याचा हिय्या झाला नाही, ती निर्यमक रचना करण्याची सुधारणा घंटय्या या एका महाराष्ट्रीयेतर कवींनीं प्रथम करून दाखविली. घंटय्या रॉबर्टसन् कॉलेजांत इंग्रजीचे प्राध्यापक होते. त्यांनीं मेघदूताच्या धर्तीवर 'मैना' हें एक लहानसें काव्य लिहिलें आहे. 'केशरी मंदील' हें बुवाबाजीचा स्फोट करणारें

त्यांचें नाटक आहे. निर्यमक काव्य लिहितांना घंटय्यासमोर इंग्रजींतील Blank verse आणि संस्कृतांतील प्रासरहित काव्य असावें.

उडूंचे लेवोनी नग, शशिकलेचा विजवरा
ललटीं शुक्राची चटक टिकली लावुन, उगा
कुसुंबी शालूचा पदर सुदशी बांधुन करें—
दिशातें ये घ्याया शुभ हळदकुंकू स्मितमुखी

हा त्यांचा सरस सुंदर श्लोक निर्यमक कवितेचें समर्थन करण्यास समर्थ आहे. घंटय्यांनीं आपल्या काव्यांत मधून मधून उर्दू शब्द पेरले आहेत. परंतु संस्कृत शब्दांच्या सारणींत ते विसंगत वाटत नाहीत अथवा कानांस खटकत नाहीत हें विशेष आहे. उदाहरणादाखल बऱ्हाणपुरच्या लालबागेचें त्यांचें हें वर्णन पहा;—

द्वाही वसंत मिरवी, पिक गात नादें
लेती वनस्पति नवाभरण प्रमोदें
पक्षी मदें गजल गात प्रिया मिळाया
बागेंत इष्क गुल सुंगत गुंग होती.

या सुधारणांविषयींच्या रेंदाळकर व माधवज्यूलियन् यांच्या चळवळी पुष्कळ नंतरच्या हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. घंटय्यांचीं पुस्तकें इ. स. १८८५ पूर्वीच प्रसिद्ध झालीं होतीं. 'मैने' ला तर दुसऱ्या आवृत्तीचें भाग्य लाभलें होतें. बुवाबाजी-वरील नाटकांत घंटय्यांनी 'कुणाचें तरी जळो नि ओसरीवर खेळो' किंवा 'भुईला पाठ लागली कीं पोट वर येतें' असें कांही असुंदर परंतु नाटकाच्या वातावरणास पोषक असे मार्मिक वाक्प्रचार वापरले आहेत. त्यावरून त्यांचा मराठीशी किती सूक्ष्म परिचय असावा हें प्रत्ययास येतें. त्यांनी 'मराठी भाषेच्या मूळ पीठिके' वर एक लहानसा प्रबंध लिहिला होता. त्यावर 'निबंध चंद्रिका' मासिकाच्या १८८४ च्या सप्टेंबरच्या अंकांत अभिप्राय आला होता. भाषाशास्त्राच्या अभ्यासाचा सुरुवातीचा एक प्रयत्न म्हणून या प्रबंधास ऐतिहासिक महत्त्व आहे. घंटय्या मोठे चळवळे होते. न्यायमूर्ति रानड्यांच्या प्रेरणेने पुण्यास मराठी लेखकांचें जें पहिलें संमेलन भरलें होतें, त्यास विधायक कार्य करण्याच्या दृष्टीने त्यांनी कांही सूचना पाठविल्या होत्या. महाराष्ट्र घंटय्यांच्या साहित्यसेवेला विसरला असला, तरी रॉबर्टसन् कॉलेजांत त्यांच्या नांवाने घंटय्या ट्रस्ट फंड हा दोन बक्षिसें देत असतो. त्या द्वारे त्यांची स्मृति कायम आहे.

घंटय्यानंतर जबलपुराशी संबंध असणारीं आणखी दोघां कवींचीं नांवें समोर येतात. त्यापैकी एक एकनाथ गणेश भांडारे यांचें नांव होय. हे कांही काळ रॉबर्टसन् कॉलेजचे विद्यार्थी होते. पुढे रेल्वेंत नोकरीला लागले. त्यामुळे यांना अनेक ठिकाणीं जावें लागलें. भांडारे यांनी 'मुक्तांजलि' या नांवाखाली इ. स. १८८८ पासून इंग्रजी वेंचिकांचीं रूपांतरें 'काव्यरत्नावली'त प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला होता. त्यांनी

'Take, O take those lips away
That so sweetly were forsworn' या शेक्सपिअरच्या गीताचें

'एकीकडे कर तुझ्या अधरास बाले !
मिथ्यानुरागि मृदु भाषण ज्यांहिं केलें—असें प्रतिबिंबात्मक

मनोहर रूपांतर केलें असून,

'Wilt thou leave me thus ?
Say nay ! say nay ! for shame '

या एका इंग्रजी गीतास

'जाणाराचि तूं मग सोडुनि गे ! काय मला सुंदरी ?
लाजेकाजे साठी "छे ! छे ! नाही" म्हण तूं तरी !

असा मराठी लावणीचा बेमालूम पेहेराव चढवला आहे. भांडाऱ्यांप्रमाणेच त्यांचे मित्र विठ्ठल भगवंत लेंभे हे रेलवेंत नोकर होते. भेडाघाट येथील संगमरवरी खडकांना जवळचें असणारें 'मीरगंज' हें रेलवे स्टेशन कांही काळ लेंभ्यांचें वसतिस्थान होतें. येथे त्यांच्या पत्नी रुक्मिणीबाई या निवर्तल्या. त्यांच्या निधनावर लेंभ्यांनी 'शोकावर्त' ही मराठींतील आर्त व आर्द्र करुण विलापिका लिहिली आहे. सुप्रसिद्ध कथाकवि चंद्रशेखर यांनी आपल्या एका कवितेंत लेंभ्यांच्या अपूर्व भाषासरणीची व कोमल पदन्यासाची मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे. शोकावर्त वाचतांना ती यथार्थ असल्याचें प्रत्ययास येतें. शोकावर्तांत भेडाघाटांतील नर्मदाप्रदेशाचें वातावरण आहे. 'भेडा नामक रम्य पर्वत तशी ही नर्मदा सुंदरी'—अशा त्या रमणीय नर्मदाप्रदेशांत, 'उदारहृदये ! तुवां पडुनि निर्धनाच्या करीं, सुखें सदानिं सेविल्या निवळ कोरड्या भाकरी'—अशा पत्नीबरोबर कवि सुखासमाधानाने कालक्रमण करीत असतां ती एकाएकीं दिवंगत झाली. तिच्या मृत्यूमुळे कवि शोकविव्हल झाला. तिचें तर्पण करीत असतांना कवि नर्मदेला विनंती करतो;—

'अगे विमल नर्मदे! शरण मीं तुला शर्मदे, तुझ्याचि विमलीं करीं पति रती सती आज दे;
दया करूनि वत्सले! जपुनियां प्रिया सुंदरी, पवित्र विमलें जलें सतत न्हाणुनी उद्धरीं.
सतीस कुरवाळुनी जननि गार वीचीकरें, स्वयेंचि शमवी हिचा पतिवियोगवान्हि त्वरें!
मला भरवसा तुझा! निरविली तुझ्याही करीं, अहा! परि उचंबळे करुण सिंधु हा अंतरीं.'

भेडाघाट व तेथील संगमरवरी खडक यांच्या सान्निध्यांत अनेक कवींना स्फूर्ति मिळाली आहे. कै. एकनाथ यादव निफाडकर यांनाहि संगमरवरी खडक पाहूनच काव्य लेखनाची स्फूर्ति झाली होती.

या नंतरचे जबलपुरचे प्रमुख कवि म्हणजे कै. दिवाण बहादुर कृष्णराव लक्ष्मण पावणस्कर एम्. ए. सी. आय्. ई. होत. पावणस्कर मूळचे सागर दमोहचे राहणारे. त्यांचे सर्व शिक्षण रॉबर्टसन् कॉलेजांत झालें. कलकत्ता विद्यापीठांत एम्. ए. च्या वर्गांत पहिल्या वर्गांत पहिले येणारे ते या प्रांतांतले पहिले विद्यार्थी होत. पुढे ते रतलामच्या महाराज कुमारांचे ट्यूटर झाले. नंतर अजमेरच्या गवर्नमेंट कॉलेजांत व मेयो कॉलेजांत ते प्रोफेसर होते आणि मग अनेक वर्षें ते किशनगढचे मुख्य प्रधान होते. विद्यार्थी असतानाच पावणस्करांनी सुप्रसिद्ध कवि Bee यांच्या 'प्रणयपत्रिके'स उत्तर दिलें होतें आणि Bee म्हणजे 'मधमाशी' म्हणून स्वतः 'मधुकर' हें टोपण नांव घेतलें होतें. Bee कवींना अखेर अखेर पर्यंत 'मधुकर' म्हणजे पावणस्कर व पावणस्करांना Bee म्हणजे गुप्ते हें माहीत नव्हतें. २० सप्टेंबर १९३५ च्या 'प्रतिभे'त प्रथम मीं या माहितीवर प्रकाश टाकला होता.

पावणस्करांनी फारच थोड्या म्हणजे २५।३० कविता रचल्या असून त्या बहुधा इंग्रजी अगर संस्कृतावरून घेतल्या आहेत. इंग्रजी, संस्कृत व मराठी या तीन्ही भाषांवर त्यांचें असाधारण प्रभुत्व असल्यामुळे त्यांचीं हीं भाषांतरें मुळांस लाजवतील इतकीं सरस व हुबेहूब उतरलीं आहेत. याचें प्रत्यंतर हवें असल्यास रसिकांनी रे० टिळकांनी संपादिलेल्या 'अभिनव काव्यमाले'च्या २ ऱ्या भागांत 'कृ. ल. पा.' या टोपण नांवाने त्यांच्या 'समुद्रवर्णन', 'बालपण', 'विरहीविलाप' व 'मृत्युमय' या कविता संकलित केल्या आहेत, त्या पहाव्या. यांपैकी 'समुद्रवर्णन' ही कविता उत्कृष्ट भाषांतराचा नमुना म्हणून श्री. रानडे व खानोलकर यांनी 'महाराष्ट्र रसवंती'त संग्रहित केली आहे. पावणस्करांच्या कांही कविता 'काव्यरत्नावलि' व 'विविधज्ञान विस्तार' या मासिकांत 'मधुकर', 'कृ. ल. पा.' व K. L. P. या टोपण नांवांनी प्रसिद्धि पावल्या आहेत. वि. ज्ञा. विस्ताराने ज्युबिली निमित्त प्रकाशिलेल्या 'विविध काव्यमालें'त 'विरह हा कठ्ठ किति आहे' ही त्यांची कविता आहे. पावणस्करांची समग्र कविता छापून निघणें आवश्यक आहे. 'चंद्रास' उद्देशून लिहिलेल्या 'Art thou pale for weariness' या शेलीच्या कवितेचें रूपांतर पावणस्करांनी केलें आहे, तें असें—

'किती वर्षें तुज पाहतसों आम्हीं, भ्रमण चुकलें तव कधीं नसे व्योमीं
तुझी कांती परि पांडुराच राहे, सख्या ! चंद्रा हें गूढ काय आहे ?
नभा आक्रमितां थकुनि काय जाशी ? श्रांत होशी कीं पाहतां धरेशीं ?
तुला तारा ज्या पथीं भेटताती, अन्य जातीच्या काय वाटताती ?

पावणस्करांनी आपल्या पत्नी कै. सौ. राधाबाई पावणस्कर यांच्या नांवें रु. १७४०० च्या दर्शनी किंमतीच्या प्रॉमिसरी नोटा नागपूर विद्यापीठास देऊन या प्रांताच्या शैक्षणिक इतिहासांत आपलें व आपल्या पत्नीचें नांव चिरस्थायी केलें आहे.

पावणस्कर स्वतः प्रसिद्धिपराङ्मुख होते. त्यांच्या कविता या प्रांतांतील दुसरे दोघे कवि, एक सिहोऱ्याचे केशव विश्वास फणसे व दुसरे बैतूलचे कै. गोविंद पांडुरंग देवधर यांनी मासिकांकडे प्रसिद्धीसाठी पाठविल्या होत्या. श्री. फणसे आता सिहोरा सोडून पुण्यास स्थायिक झाले आहेत. त्यांनी कै. हरि माधव पंडितांकडून कवितालेखनाचे पाठ घेतले होते. त्यामुळे त्यांची कविता वृत्तबद्ध व भारदस्त असते. त्यांची बरीच कविता प्रासंगिक आहे. निर्यमक कवितेचा पाठपुरावा करतांना त्यांनी ' प्रौढ स्त्रीस पदांत नूपुर झणत्कार त्रपा देतसे ' या आशयाचा जो युक्तिवाद केला होता, तो कोणाहि विचारवंतास निरुत्तर करील असाच होता. देवधर हे मूळचे अजमेरचे. परंतु वकिलीच्या व्यवसायासाठी ते बैतूलाला स्थायिक झाले. ते इंग्रजी विषयांत अलाहाबाद विद्यापीठाचे एम्. ए. होते. अरविंद घोष यांच्या ' उषा आणि अनिरुद्ध ' या इंग्रजी काव्याचें त्यांनी भाषांतर केलें आहे. वि. ज्ञा. विस्तार, मनोरंजन व काव्य रत्नावलि या मासिकांचे ते प्रमुख कवि होते. फणश्यांची कांही कविता अभिनव काव्यमालेच्या ३ ऱ्या व ४ थ्या भागांत आणि देवधरांची कांही कविता २ ऱ्या भागांत संकलित झालेली आहे. फणश्यांच्या पत्नी कै. शांताबाई यांचीहि कविता ३ ऱ्या व ५ व्या भागांत आहे. ती साधी, सरळ व हृदयंगम आहे.

कै. मनोहर कृष्ण ऊर्फ अप्पासाहेब गोळवेलकर हे जबलपूरचे खरेखुरे कवि होत. ते लहानपणापासून जबलपुरांतच वाढले आणि अखेरपर्यंत जबलपुरांतच

राहिले. हिंदी मराठी समाजांत आपल्या मिष्ठास व मोकळ्या स्वभावामुळे ते सारखेच लोकप्रिय होते. त्यामुळे त्यांना त्यांच्या मित्रांनी ‘ अजातशत्रु ’ ही पदवी दिली होती. गोळवेलकरांची कविता अभिनव काव्यमालेच्या ३ ऱ्या भागांत आहे. शेलीच्या Love's Philosophy चें त्यांचें रूपांतर मूळाइतकेंच भावोत्कट उतरलें आहे. ‘ प्रभुस्तोत्रगान मधुर सकल सृष्टि गातसे ’ आणि ‘ सुप्रभातीं थोडें तरि रे दुग्ध घेई ईश्वरा ! ’ हीं त्यांचीं भावमधुर भावडीं गीतें जबलपुरांत आणि जबलपुराबाहेर अनेक घरांत म्हटलीं जातात. त्यांच्या पत्नी श्रीमती मनोरमाबाई गोळवेलकर यांनीहि कवितालेखनांत आपल्या माहेरचा म्हणजे कोल्हटकरांच्या कुळाचा व सासरचा वारसा घेतला आहे.

आतांपर्यंत ज्या साहित्यिकांचा नामनिर्देश केला, त्यांच्या मालिकेंतच कै० पंडित माधराव सप्रे यांचें नांव गोंवावें लागेल. ते राजकारणांत पडणारे होते. त्यामुळे त्यांनी ‘ दासबोध ’ व ‘ गीतारहस्य ’ यांचीं हिंदी भाषांतरें केलीं, आणि लोकमान्यांचा मराठी केसरी ‘ हिंदी केसरी ’ केला. दोन भाषांच्या समन्वयाच्या दृष्टीने आणि मराठींतील उत्कृष्ट विचार महाराष्ट्राबाहेर प्रसारित करण्याच्या दृष्टीने सप्रयांचें स्थान अनन्यसाधारण आहे. हिंदी साहित्य संमेलनाच्या एका अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. हिंदींत वर्तमानपत्र चालविण्याची सप्रयांची ही परंपरा खांडव्याच्या ‘कर्मवीरा’ने चालविली आहे. त्याचे संपादक कै० सिद्धनाथपंत आगरकर (लोंढे) यांच्या पश्चात् त्यांच्या चिरंजीवांनी आपल्या वडिलांची परंपरा चालू ठेविली आहे. याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. सप्रयांच्याच संप्रदायांत अध्यापक जहूरबख्श यांच्या सहकार्याने लिहिणारे रिंगे, अध्यापक तामस्कर, श्री. अनंत गोपाळ शेवडे यांचा निर्देश आवश्यक आहे. ही मंडळी हिंदी लिहिण्यांत सिद्धहस्त आहे. सागरच्या जुन्या पिढींत गोविंद विष्णु श्रीखंडे हे एक थोर साहित्यप्रेमी होते. त्यांनी काव्यसंग्रहासाठी ओकांना अनेक पोथ्या उपलब्ध करून दिल्या होत्या आणि ‘रूपनगरची राजकन्या’ या कादंबरींत घालण्यासाठी कै० हरिभाऊ आपट्यांना अनेक प्रसंगोचित दोह्यांची निवड करून दिली होती.

जबलपुरास शिक्षणखात्यांतील नौकरीनिमित्ताने कांही काळ राहिलेल्या विद्वानांनीहि थोडें फार उपयुक्त वाङ्मय निर्माण केलें आहे. त्यांपैकी प्रि. गंगुताल्या कानिटकर, प्रा. मटंगे, प्रा. ना. के. वेहेरे व प्रा. नारळकर यांचा केवळ उल्लेख करणेंच येथे इष्ट होईल.

सध्या जबलपुरास वास्तव्य करणाऱ्या साहित्यिकांत फक्त एकच नांव पुढे येतें. तें म्हणजे सौ. मनोरमाबाई नावलेकर हें होय. ‘ भावकुसुमांजलि ’ व ‘पणती’ हे नावलेकरांचें दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. यांपैकी दुसरा संग्रह नागपूर विद्यापीठाने इंटरच्या परिक्षेसाठी लाविला आहे. नावलेकर या आनंदी व आशावादी कवयित्रि आहेत. त्यांच्या कवितांत प्रेम, वात्सल्य, कारुण्य, हास्य इत्यादिकांच्या सूक्ष्म व नाजुक छटा उमटलेल्या आहेत. या कवितांना सुरावट असल्यामुळे त्यांची माधुरी अवीट आहे. जबलपूर जेलच्या मेट्रन सौ. काळे यांनीहि भावमधुर गीतें रचलीं आहेत. परंतु संख्येने तीं थोडीं आहेत. महाराष्ट्र हायस्कुलांत कांही काळ अध्यापक असलेले श्री. पाठक यांनीहि थोडें फार लेखन केलें आहे. परंतु तें वाचकासमोर फारसें आलेलें नाही.

अनुक्रमणिका

हुशंगाबाद व जबलपुरचे राहणारे परंतु पुढे नागपुरास आलेले कै. दत्तात्रेय वासुदेव हर्णे एक होतकरू विडंबक होते. यशवंतांच्या 'आई' या कवितेचें 'पत्नी' व 'मम सुमन कुणा हें देऊं कमलाकरा' या कवितेचें 'मम सुमन कुणा ही देऊं शास्त्रीबुवा' हीं त्यांचीं दोन विडंबनें त्यांच्या सूक्ष्म विनोदबुद्धीची साक्ष देण्यास समर्थ आहेत. इ. स. १९४३ साली नोरगांवाजवळ मुंबईहून कलकत्त्यास जाणाऱ्या मेलला जो भीषण अपघात झाला, त्यांत हे तरुण कवि आपली पत्नी व तीन मुलें यांसह मृत्युमुखीं पडले. हर्ण्यांची कविता 'स्मृतिकुंज' या नांवाने त्यांचे स्नेही देवासचे राजकवि झोकरकर यांनी संपादून प्रसिद्ध केली आहे.

जबलपुराव्यतिरिक्त महाकोसलमधील इतर ठिकाणी जे साहित्यिक आहेत, त्यांच्या नामनिर्देशाशिवाय हा लेख पूर्ण होणार नाही. त्यांची यादी करतांना छिंदवाड्याच्या पितापुत्र मांजरेकरांचा प्रथम उल्लेख केला पाहिजे. कै. शांतारामपंत मांजरेकर हे मनोरंजनाचे अव्वल पिढींतील एक कथालेखक होते. खुसखुशीत विनोद व भरपूर मनोरंजन हे त्यांच्या कथांचे विशेष होते. त्यांचे चिरंजीव प्रभाकरपंत हे अलिकडे फारसे लिहीत नाहीत. परंतु 'उषः प्रभा' हा त्यांचा एकुलता एक कथा संग्रह त्यांच्या नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेची साक्ष देण्यास समर्थ आहे. स्वभावरेखन व मानसशास्त्र या दृष्टींनी 'नवें कुत्रें' आणि 'वेश्या व साधु' या त्यांच्या कथा वाचनीय आहेत. सौंसरचे श्री. रा. वि. काळी हे एक रसिक व मार्मिक टीकाकार आहेत, 'लावण्यांतील सौंदर्य' आणि 'खय्यामच्या रुबाया' हे त्यांचे निबंध त्यांच्या रसग्राही विवेचक बुद्धीचे द्योतक आहेत. सागर विद्यापीठ स्थापन झाल्यापासून तेथेहि प्रा. शेट्ये, डॉ. भवाळकर, सौ. देव, प्रा. दा. ल. अडोणी इत्यादि साहित्यिकांचा मेळावा जमला आहे. ही सारी मंडळी उत्साही असून आपआपल्या आवडत्या विषयावर लेखन करण्यांत कुशल आहेत.

यांशिवाय इतर अनेक साहित्यिक असण्याचा संभव आहे. परंतु लेखकाच्या अज्ञानामुळें अथवा नजर चुकीमुळें या लेखांत त्यांचा नामनिर्देश करण्याचें राहून गेलें असेल. तरी त्याबद्दल त्यांनी त्याला उदार अंतःकरणाने क्षमा करावी अशी विनंती आहे.

साधारण सभेची सूचना

संघाची वार्षिक साधारण सभा जबलपूर येथे विदर्भ साहित्य संमेलनाच्या ठिकाणीं, खुलें अधिवेशन भरण्यापूर्वी, म्हणजे शनिवारीं ता. ३-५-१९५२ रोजीं दुपारीं १२ वाजतां भरेल. या सभेपुढे येणारे विषय पुढीलप्रमाणे:—

(१) मागील साधारण व विशेष साधारण सभेचें वृत्त.
(२) संघाचा वार्षिक अहवाल व जमाखर्च.
(३) पुढील वर्षाचें अंदाजपत्रक. (४) हिशेब तपासनिसाची नियुक्ति.
(५) पुढील निवडणुकीसाठी, नवीन घटनेप्रमाणे, 'निवडणुक लवादाची' नियुक्ति
(६) विश्वस्तपत्र. (७) अध्यक्षांच्या अनुमतीने इतर विषय.

गणपूर्ति न झाल्यास, त्याच जागीं ही सभा, वरील नमूद केलेल्या वेळानंतर अर्धा तासानें भरेल.

नागपूर
ता. १८-४-१९५२

ग. त्र्यं. माडखोलकर, सरचिटणीस
वि. सा. संघ.

पूर्वस्मृति

गो. रा. दोडके

★

इंदूनं करायला घेतलेलं स्वेटर पुढ्यांत ओढलं, सुया हातांत घेतल्या आणि ती तें विणूं लागली. जवळच सतरंजीवर तिचं लहान मूल झोंपी गेलं होतं. थोरला विश्वास शाळेंत गेला होता. नवरा आपल्या रेडिओच्या दुकानावर गेला होता. सगळी आवरासावर करून निवांत वेळ मिळाला होता. हिंवाळा यायच्या अगोदर स्वेटर पूर्ण व्हायला हवं होतं आणि तोहि कांही फारसा दूर नव्हता. खेळतंमाळतं मूल भोंवतीं भोंवतीं करायला असल्यावर असलं काम करायला वेळ क्वचितच मिळायचा. नवरा माणसांचा भुकेला. त्यामुळं घरीं येणारे जाणारे पुष्कळ, आदरातिथ्यहि बरंच, त्यामुळंहि स्वेटर रेंगाळत पडलं होतं. पण आज निवांतपणा मिळाल्यामुळं बरंच काम करायचं अशा निश्चयानं तिनं कामाला हात घातला होता. स्वेटर भराभर विणला जाऊं लागला. तिच्या हाताला गति चांगली होती. विणून राहिली होती तें नवऱ्याकरितां. प्रेमाचं, हौसेचं काम होतं. त्यांत ती रमून गेली. थोडेसेच टाके घालून झाले, तो तिच्या कानावर हांक आली. " इंदुताई, " तिनं मान वर करून पाहिलं. हांक मारणारी वसुधा तिच्या अगदी समोर उभी होती.

" मी तर तुला पाहिलंहि नाही आंत येतांना. "

" तुम्ही कामांत रमून गेलां होतां. मी आंत येतांयेतां तुमच्याकडे पाहिलं, नि मनांत आलं तुम्हाला हांक न मारतांच निघून जावं. झोंपी गेलेल्या माणसाला नाही उठवावंसं वाटत आपल्याला तसंच वाटलं मला. "

" चांगली जागी होतें नि काम करत होतें.

" म्हणूनच तर. "

" खूप रेंगाळलं आहे ग, आणि आतां लवकर संपवायला हवं. बरं असूं दे, तूं आलीस कशी ?"

" आईचा निरोप आहे. "

" काय ?"

" आज सायंकाळीं जाणार होतां ना तुम्ही भांडीं आणायला ? आई म्हणाली, आज सायंकाळीं नको, उद्याला जाऊं, तिनं कळवायला सांगितलं तुम्हाला. "

" बरं. " इंदु म्हणाली, आणि मग वसुधेला उभीच बघून ती उद्गारली "अग बैसना, उभीच राहशील. "

" नाही येते आतां, साडेतीन झाले, दादा येईल घरीं. "

" साडेतीन झाले, मग तूं घरीं ग कशी ? सुट्टी आहे शाळेला ?"

"नाहीं, सुट्टी नाही, नाही गेलें,—" तिचा आवाज घोगरा झाला, कंठ दाटून आला, डोळ्यांतून ओघळून आंसवं गालांवर आलीं. झटकन तिने तोंड वळवून घेतलं. पण इंदूनं तिचीं आसवं पाहिलीं होतीं. तिच्या मनांत कांहीतरी दुखतं आहे याची तिला जाणीव झाली होती. आसवं बघतांच हातांतलं स्वेटर तिपाईवर ठेवून ती चटकन् उठली. वसुधेला तिनं विचारलं,

"काय झालं ग वसू ?"

पण वसुधेच्या तोंडून शब्द फुटेना. तिला हुंदक्यावर हुंदके यायला लागले. कांही आसवं इंदूच्या हातावर ओघळलीं. तिच्या अंतःकरणाची व्यथा वाढली. पण वसुधा इतक्यांत कांहीच बोलायची नाही असं वाटून तिच्या पाठीवर हात ठेवून ती नुसती उभी राहिली. तिचे हुंदके थोडे कमी झाल्यावर, पाहिला उमाळा ओसरल्यावर कोमल, करुण स्वरांत इंदूनं विचारलं, "कां नाही गेलीस ग शाळेंत आज ?" हें विचारत असतांना एका दिवशींची तिला आठवण झाली. त्या दिवशीं इंदूच्या मुलाचं बारसं होतं. ती वसुधेला म्हणाली होती, "आज नको ग शाळेंत जाऊं. एका दिवसानं काय व्हायचं आहे मोठं ?" पण ऐकून वसुधेला रडूं आलं होतं.. आज ती शाळेंत गेली नाही, घरींच आहे, यांत कांहीतरी विपरीत आहे खास, हा कयास तिच्या मनानं केला होता. सहानुभूतीनं, कुतूहलानं तिने तिला घरीं राहण्याचं कारण विचारलं होतं.

"काय करायचं शाळेंत जाऊन ? शाळेंत तरी कसं जायचं आतां ?"

"कां ग ?"

"परीक्षेची फी—" पुन्हा तिला उमाळा आला.

"काय झालं परीक्षेच्या फीचं ?"

"देतां नाही यायची. भाऊंची नोकरी गेली. दादा म्हणाले, आतां परीक्षेची, शाळेची फी, सगळं राहूं द्या. पुढच्या वर्षी परीक्षेला बसशील, एका वर्षानं कांही बिघडायचं नाही."

पुन्हा आसवं ओघळलीं, हुंदक्यावर हुंदके आले, रडतच ती म्हणाली "येतं मी" आणि इंदूच्या मुखांतून कोणताहि उद्गार निघण्याच्या अगोदर ती निघून गेली.

वसुधा निघून गेल्यावर, कांही वेळपावेतों इंदु दाराकडे बघत जशीच्यातशीच उभी राहिली. वसुधेची केविलवाणी मुद्रा बघतां बघतां, तिचं रडणं ऐकतां ऐकतां, तिचा जीव स्वतःच रडायला लागला होता. अंतःकरणांत भावनांचा कल्लोळ उडाला होता. पोरीचं दुःख सहानुभूतीनं तिनें ऐकलं होतं आणि आतां तें दुःख तिचं झालं होतं. तिनं एक उसासा टाकला नि मग ती चटईवर बसली. स्वेटर आणि सुया हातांत घेऊन तिने तो विणायला आरंभ केला. थोडा वेळ सुया चालल्या आणि एकाएकीं थांबल्या, वसुधेचं दुःख पुन्हां तिच्या मनांत थैमान घालूं लागलं. —पोरीचं आयुष्य काय असंच जायचं ! पुढच्या वर्षी ती बसेल परीक्षेला. एक वर्ष ! कांहीच अर्थ नाही त्याला जीवनाच्या दृष्टीनं ! मुलीचं आयुष्य ! जाऊं द्या.— पुन्हा तिचं लक्ष हातांतील स्वेटरकडे गेलं. सुया थांबल्याचं आणि समोर तें स्वेटर तसंच

पडून राहिल्याचं तिला नवल वाटलं. पुन्हां सुयांची हालचाल सुरू झाली. कांही टांके घातले गेले. पण स्प्रिंग तुटलेलं घड्याळ, मुद्दाम प्रयत्न केला तर थोडसं टिकटिक करतं नि थांबतं तसंच तिच्या मनाचं झालं होतं. तिनं स्वेटर जमिनीवर ठेवलं. मान टाकून दिलेल्या नाजुक प्राण्यासारखं तें तिला वाटलं. ती उठून उभी राहिली. तिच्या सुखावर उत्सुकता झळकली. ती आंतल्या खोलींत गेली. एक ट्रंक उघडली. त्या ट्रंकेच्या तळांतून तिने एक वस्तू वर काढली. झांकण नीट लावलं. वस्तू हातांत घेऊन ती बाहेर आली. चटईवर बसली. तिच्या हातांत एक चष्मा होता. जुनाट. काचांवर ओरखडे पडले होते, डावी उजवी काडी सारखी नव्हती. कुणालाहि त्याचा उपयोग होण्यासारखा नव्हता. विश्वासनं तिला एकदा तो खेळायला मागितलाहि होता. पण दुसरा चांगला देण्याचं वचन देऊन तिनं तो ट्रंकेंत ठेवला होता. त्या चष्म्याच्या काचांकडे बघतां बघतां भोंवतालचं वातावरण पार बदलून गेलं. समोरचं स्वेटर दिसेनासं झालं. जवळच निद्रिस्त असलेल्या मुलाची जाणीव हरपली. भोंवतालचा सगळा सुखवस्तु पसारा अंतर्धान पावला. अनेक माणसांनी गजबजलेलं भिकारडं घर, तुटपुंज्या पगारानी माणसं ती बघू लागली आणि त्या घराच्या दरिद्री जीवनांत स्वतःला—स्वतःच्या चिमुकल्या विद्यालयीन जीवनाला !

शाळेंत वैद्यकीय तपासणी चालली होती. दहाव्या वर्गाची तपासणी झाली की, त्यांच्या वर्गाची तपासणी होती. दहाव्या वर्गाची झाली असावी. कारण वर्गाच्या दारांत येऊन मास्तर म्हणाले, "हजेरी पुस्तकांतील आपापल्या अनुक्रमांकाप्रमाणे या." एकएक मुलगी जाऊं लागली. तिच्या वरची मुलगी गेली. तिचं हृदय धडधड करूं लागलं. वरची मुलगी बाहेर येतांच तिने खोलींत प्रवेश केला आणि ती डॉक्टरीणबाईपुढे उभी राहिली. डॉक्टरीणबाईनं तिला तपासलं. नंतर भिंतीला टांगलेल्या आराखड्यांतील एका अक्षरावर बोट ठेवलं. तिनं कोणतं तरी स्वरव्यंजन उच्चारलं, आणखी एक दोन अक्षरांवर बोट ठेवलं. तिनं वाटलं तें सांगितलं. डॉक्टरीणबाई टेबलाजवळ आल्या आणि प्रकृतिपट भरूं लागल्या. लिहून झाल्यावर त्यांनी इंदूला विचारलं,

" वर्गांत फळ्यावर लिहिलेलं दिसतं ग तुला ?"

" अंधुक दिसतं "

" अक्षरं ओळखतां येतात ?"

" मास्तर सगळं बोलतातच आधी. मग काय लिहिलं असेल याची कल्पना करतां येते. "

" मास्तरांना कधीं सांगितलं होतं, दिसत नाही म्हणून ? "

" नाहीं. "

" कां ग ?"

" सांगायची भीति वाटली मला ! "

" भीति ! भीति कशाची ! "

" चष्मा मला घेऊन देतील, याची. "

" असं ?"

" एका मुलीला असंच कमी दिसायचं, तेव्हा शिक्षकांनी आपल्यांतच पैसे गोळा करून तिला चष्मा घेऊन दिला होता."

" मीं दिला तर घेशील ?"

" अं हं."

" मग डोळ्यांचं काय ?"

" अं ऽ ऽ !"

प्रकृतिपुस्तकांत माहिती लिहून झाल्यावर डॉक्टरीणबाई म्हणाल्या, "जा तूं, पुढच्या मुलीला पाठवून दे."

खोलींतून बाहेर आल्यावर तिचा जीव खालींवर होऊं लागला. आजवर आपण आपल्या डोळ्यांचा अधुपणा इतरांपासून लपवण्याचा प्रयत्न केला. त्यांत आपल्याला यशहि आलं. पण आतां मास्तर वह्यांतील शेरे पाहतील. डॉक्टरीणबाईच्या मदतीला असलेल्या स्त्रीशिक्षिका इतर शिक्षकांना आपण जें बोललों तें सांगतील आणि आपण आतांवर मूग गिळून राहिल्याबद्दल आपल्याला बोल लावतील, रागावतील, चष्मा आणून देतील, घ्यायला भाग पडतील.

याच विचारानं तिचं मन कण्हूंकुथूं लागलं होतं.

शेवटचा तास संपायला थोडासाच वेळ उरला होता. तिला वाटत होतं, तो एकदम संपून जावा. मग प्रसंग उद्यांवर जाईल. उद्यापर्यंत विचार करून मास्तरांना काय सांगायचं तें ठरवूं. पण मास्तर म्हणतील,—रागावतील,—खूप टाकून बोलतील,—मनाशीं असेच तिचे विचार चालले असतांना घंटा झाली आणि कुणाचीहि वाट न बघतां, ती शाळेंतून बाहेर पडली.

दुसरे दिवशीं वर्ग घेऊन झाल्यावर मास्तर तिला म्हणाले " सरोज—" ती चपापली. आपलं हें शाळेंतलं, माहेरचं नांव तर आपण पार विसरून गेलों होतों. आज जर आपल्याला कुणी सरोज म्हणून हांक मारली तर पहिल्या हांकेला कांहीं आपण ओ देणार नाहीं, तिला हंसूं आलं, आणि लागलीच तें मावळलं. " सरोज, मधल्या सुट्टींत मला भेटशील, एवढंच बोलून ते निघून गेले. पण मधल्या सुट्टी-पावेतो तिचं कशांतच लक्ष लागलं नाहीं. दोन तास झाले, इतर शिक्षक शिकवून गेले. पण त्यांनी सांगितलेलं कांहींच तिच्या ध्यानांत आलं नाहीं. मधल्या सुट्टींत काय होणार हाच विचार तिच्या मनांत थैमान घालत होता. सुट्टीची घंटा झाली. तिचे पाय वर्गाबाहेर पडायला नाकारूं लागले. पण एक मुलगी आंत आली आणि तिनं सांगितलं. " सरोज जोशीला मास्तर बोलावताहेत." आतां मात्र चटकन् जाणं भाग पडलं. आपल्याकडून वेळ झाला, तर इतर सगळं राहील बाजूला आणि दिरंगाईबाबतच खरडपट्टी काढली जाईल. जाऊन ती मास्तरांच्या खोलीच्या दारा-जवळ उभी राहिली. मास्तरांनी तिला येतांना पाहिलं होतं. ते म्हणाले, " आंत ये." ती आंत गेली आणि मान खाली घालून उभी राहिली.

" डॉक्टरीणबाईनी काय लिहिलं माहीत आहे तुला?"

" नाहीं."

"त्यांनी लिहिलं आहे, तुला चष्मा लावायला हवा म्हणून. डोळ्यांनी तुला नीट दिसत नव्हतं ना?"

" नाही "

" आणि तरीहि तूं कांहीहि केलं नाहीस. घरीं कळवलं?"

" घरीं सांगून काय झालं असतं? चष्मा कांही मिळाला नसता. "

"कां ग?"

"आम्ही गरीब आहोंत."

"मग तूं आम्हांला कां नाही सांगितलं?"

ती उगीच राहिली.

"स्वतःच्या भावनेच्या पायीं डोळे गमवायचं ठरवलं होतं ना?"

तिला कांहीच उत्तर देतां येईना.

"तूं डॉक्टरीणबाईजवळ म्हणालीस, मी मास्तरांना सांगितलं नाही. कारण मला त्यांची भीति वाटली आणि भीति कशाची? तर ते चष्मा घेऊन देतील ह्याची. हा कुठला ग मानीपणा? शिबिराजाला डोळे मागणाऱ्या दुर्वासाचीच भूमिका तुझा मानीपणा करत होता.—" तिला हुंदू आलं. असं बोलण्याची मास्तरांची रीतच होती. " डोळे म्हणजे खेळ वाटला तुला? असले तर ठीक, नसले तर ठीक. गेले तर रडत बसशील ना जन्मभर. ठीक आहे. तूं घरचं कुणीतरी बरोबर घेऊन डॉक्टरांकडून डोळे तपासवून घे. चष्मा करायला सांग, पैशाची काळजी तुला नको."

" पण सर———"

" पणच्या गोष्टी करतेस?"

" मी पैसे कसे परत करीन?"

" ह्याची तुला कशाला काळजी? सांगितलं तसं झालंच पाहिजे." कांही क्षण ते शांत बसून राहिले. आतांवर मुखावर आणलेला कठोरपणा मावळला, मृदु स्वरांत ते म्हणाले, "वेडी आहेस, आज तुला पैसे देतां येत नाहीत, नको देऊंस, जगांत पुष्कळ असे आहेत कीं ज्यांना इतरांकडे बघावं लागतं, इतरांसमोर हात पसरावा लागतो. कुणी आपल्यासमोर हात पसरला, एखाद्या अभाग्याचं दुःख कानावर आलं, एखाद्याची गरज कळली, अशा वेळेला आपल्यावर येऊन गेलेल्या प्रसंगाची जाणीव झाली, एके काळच्या ऋणाची स्मृति झाली, आपण आपल्या शक्तीप्रमाणे थोडंथोडकं करूं शकलों तर कुणी कुणाचा ऋणी नाही. जा, सांगितलं तसं कर. पैशाची काळजी करूं नकोस, संध्याकाळींच जाशील डॉक्टरकडे."

तिनं हातांतल्या चष्म्याकडे नजर टाकली. डोळ्यावरचा नेहमीचा चष्मा काढून, आयुष्यांतला पहिला चष्मा तिनं डोळ्याला लावला. सगळं अंधुक दिसूं लागलं. चष्मा काढून तिनं हातांत घेतला व त्याच्याकडे बघत राहिली. कांही वेळांपूर्वी अंतःकरणांत उद्भवलेलं दुःख ओसरून गेलं. कोणतातरी संकल्प झाल्यामुळे निश्चिंत झालेल्या माणसाप्रमाणे ती उठली. निकामी चष्मा तिने आंत जाऊन ट्रंकेंत ठेवला. ८८

ट्रंक बंद करून बाहेर येऊन ती मुलाच्या बाजूला चटईवर बसली आणि तिने स्वेटर उचलला. पण त्याच वेळीं बाहेरच्या फाटकाची कडी वाजल्यामुळे स्वेटर हातांत घेऊनच ती बाहेर गेली. पतिदेवाला पाहतांच उद्गारली, " चहाची वेळ झाली वाटतं ! मग अनील कसा नाही उठला अजून ?"

"तो तुझं घड्याळ आहे वाटतं ! देना त्याला किल्ली. आतां तर वाजेल चहाची वेळ."

चहा घेत असतांना ती त्याला म्हणाली, "एक वचन द्याल ?"

"कोणतं ? कसलं वचन ?"

"मग सांगतें, आधी दिलं म्हणा."

"आधी सांग, मग देईन."

"अहं, आधी द्या"

"नाही, आधी सांग."

रडकुंडीला येऊन ती म्हणाली " हें असं काय करतां हो ! आधी द्याना वचन."

"वारे वा, आधी कसं द्यायचं ? तूं म्हणशील, सातासमुद्रापलीकडून अजगराच्या घशांतून—"

"पुरे पुरे, असं नाही कांही."

"मग कसं ? सांग."

"आधी दिलं म्हणा."

"बरं दिलं,"

"बरा वरं,"

"आतां हें काय ? सांगना."

"आपली वसुधा आहे ना!"—

विदर्भ साहित्य संघाच्या
यंदाच्या जबलपूर येथील अधिवेशनाची तयारी

ता. ७ एप्रिल रोजीं जबलपूर येथील महाराष्ट्र विद्यालयांत श्री. केकरे, वकील यांच्या ध्यक्षतेखाली स्वागत सभासदांची सभा भरून सर्वानुमतें पुढील पदाधिकारी निवडण्यांत आलेः—

स्वागताध्यक्षः—श्री. गोविंद विश्वास भावे

स्वागतोपाध्यक्षः—सौ. मनोरमाबाई नावलेकर, सौ. ताराबाई शद्दे, प्रा. वामन विश्वास भावे, श्री. चिंतामणराव गोंदियावाले, श्री. बळवंतराव तेलंग,

स्वागत-चिटणीसः—प्रा. गो. मो. रानडे

दुय्यम चिटणीसः—श्री. पंढरीनाथ विष्णु रानडे

कोशाध्यक्षः—श्री. कृष्णाजी परशराम दाभोळकर

कार्यकारी मंडळाचे सभासदः—श्री. रा. द. ठोसर, श्री. सुखात्मे, श्री. स. भा. परांजपे, श्री. दि. शं. पाठक, श्री. पां. ग. चौधरी, श्री. वा. मो. आठल्ये, श्री. पु. ग. अडावदकर.

रा. पु. सगदेव,
चिटणीस

अज्ञानाची उघडी मूठ

शा न्ता रा म

★

कधी कधी माझ्यावर एक बाका प्रसंग येतो—कधी कधी काय पुष्कळदाच. ज्या गोष्टीचं मला विशेष गम्य नाही त्या गोष्टीबद्दल माझं मत विचारण्यांत येतं. अशा वेळीं आपलं ज्ञान—ह्मणजे अज्ञानच कसं प्रगट करावं हें मला कळत नाही. माझ्या घरीं एखादा स्वेटर विणायला घेतला गेला किंवा पूर्ण झाला की माझं मत विचारण्यांत येतं. अशा वेळीं काय उत्तर द्यावं हें मला नीट कळत नाही आणि मी असं उत्तर देतों की ज्यामुळे माझंहि समाधान होऊं नये आणि ऐकणाऱ्याचंहि होऊं नये. साधारण स्थूल मानानं मी म्हणतों, "स्वेटर चांगला आहे, बरा आहे, वीण सुरेख आहे, यापेक्षा तो पूर्वीचा आकार मला आवडला" इत्यादि. पण या उत्तरामुळे माझं मत विचारणारं माणूस प्रसन्न होण्याऐवजी चिडतं असंच मला दिसून आलं आहे. त्या माणसाला—म्हणजे तिला--हवं असतं अधिकृत मत. एखादी विशिष्ट वीण दुसरी-पेक्षा किती निराळी आहे, ती तशी कां आहे, तिच्या बारकाव्या काय आहेत इत्यादि-बाबत मत ऐकल्याशिवाय तिचं समाधान होत नाही. माझी एखादी कथा किंवा निबंध नुसता "उत्तम" आहे असं मला कुणी सांगितलं तर माझं तरी समाधान कुठं होतं ? त्यापेक्षा "वाईट" अभिप्राय देतांना कुणी दृष्टीची सूक्ष्मता दाखवली तर तें मला आवडतं. पण माझ्या लिखाणाबाबत अधिकृत मत देणं जितकं सोपं आहे तितकं वीणकाम, भरतकाम इत्यादिबद्दल बोलणं सोपं नाही; मला तरी तें तसं वाटत नाही. दोन उलटे, चार सुलटे, पांच सुलटे, दहा उलटे, हीं पारिभाषिक वर्णनं माझ्या कानांवरून अनेकदा गेलीं असलीं तरी माझ्या डोक्यांत त्यामुळे मुळीच अर्थबोध होत नाही ; उलट्यासुलट्यांची ही भाषा मला कमालीची उफराटी वाटते; अतिशय लपेटीची वाटते. त्यामुळे मी तिचा उपयोग करूं शकत नाही. खरं सांगायचं तर या बाबतींत मी बराच अनभिज्ञ आहे. एखादा अपुरा स्वेटर माझ्यापुढे धरला तर त्याची वरची बाजू कोणची आणि खालची कोणची हें देखील मी बहुधा सांगूं शकणार नाही. अशा माणसावर सूक्ष्म अभिप्राय देण्याचा प्रसंग आला तर तो एक बाका प्रसंग नाही का ! या प्रसंगांतून निसटण्यासाठी मी कांही तरी मोघम उत्तर देतों आणि कधी कधी फशी पडतों. मला वाटतं पुष्कळ पुरुषांना हा अनुभव येत असेल.

वीणकामाचं अथवा अशा एखाद्या नाजूक कारागिरीचंच उदाहरण घ्यायला पाहिजे असं नव्हे. जेवतांना देखील असाच अनुभव आपल्याला नेहमी येतो. हातांत,

आलेला अरबाईट पदार्थ आपण मुकाट्यानं खाऊन टाकला व एक अक्षर न बोलतां जेवण संपविलं तर फक्त खाणावळवाला खूष होईल; घरांतल्या स्त्रियांना मात्र आपली मतं हवीं असतात. त्या मतांमुळे त्यांच्या पाककौशल्याची स्तुति झाली तर ती त्यांना हवीच असते. पण निदान बरंवाईट मत ऐकण्याची त्यांना उत्सुकता असते व तें ऐकायला मिळालं तरच त्या कृतार्थ होतात. मला तर कधी कधी असा संशय येतो की रोज स्वयंपाक करणाऱ्या स्त्रिया एखादे दिवशीं मुद्दामच स्वयंपाक बिघडवीत असाव्यात. मुद्दाम जास्त मीठ घालून अथवा अजिबात न घालून किंवा तिखटाचा फणकारा खाणाऱ्याच्या ब्रम्हांडापर्यंत पोचवून त्या मुद्दामच त्याला मतप्रदर्शन करायला भाग पाडीत असाव्यात. आपलीं मतं त्यांना पटलीं नाहीत तरी आपल्या मनांतील कळकळ त्यांना हवी असते. शिक्षकांचं देखील असंच होतं. मला आठवतं. मी शिकत असतांना एका विषयाच्या तासाला पुष्कळ दिवस आमच्या डोक्यांत कांहीच शिरत नसे. पण आम्ही मुद्दामच तास चालू असतां मध्येच एखादा मूर्ख प्रश्न किंवा विक्षिप्त शंका उपस्थित करीत असूं आणि आमचे शिक्षक आम्हाला विषय नीट समजावा म्हणून तळमळीनं आमच्या शंकांचं निरसन करीत असत, आपली बाजू वारंवार मांडीत असत; आम्हाला समजावून द्यायचा, पटवून द्यायचा प्रयत्न करीत असत. माझ्यासारख्या शिक्षकानं अशा आठवणी आपल्या धंद्याच्या दृष्टीनं आता सांगूं नये हें खरं. पण हें सगळं सांगण्यांत माझा एक हेतु आहे. मला हें सांगायचं आहे की माणसांनी आपण चुकतों की काय या भीतीनं पछाडलं जाऊं नये; ज्ञान-अज्ञानाविषयी अवास्तव सावधगिरी बाळगूं न ये; आपलं म्हणणं चूक की बरोबर या प्रश्नाचा फाजील विचार करूं नये. आपल्याला समजला नसेल त्या विषयावरहि बिनदिक्कत बोलावं मत प्रगट करावं. अधिकारवाणीनं बोलावं असं मी म्हणत नाहीं. पण कुणी जर बोलण्याचा हक्क आपल्याला देत असेल तर तो अवश्य गाजवून घ्यावा.

"मला यातलं कांही कळत नाही" "हा माझा विषय नव्हे" अशा प्रकारची भाषा जे लोक वापरतात त्यांना मी प्रांजळहि समजत नाहीं आणि नम्र तर मुळीच समजत नाही. स्वतःच्या ज्ञानाची प्रौढी मिरवण्यापेक्षा अज्ञानाची शेखी मिरवणाऱ्यांना मी अधिक गुन्हेगार समजतों. स्वतःच्या अज्ञानाचं स्तोम माजविऱ्यांचा एक फार मोठा वर्ग समाजांत नेहमीच अस्तित्वांत असतो. अशा लोकांना मी दांभिक समजतों. यांची समजूत अशी असते की आपण जें बोलूं तें अगदी निखालस सत्य असलं पाहिजे; आपला शद्ब अगदी शेवटचा ठरला पाहिजे. त्यांना हें कळत नाही—किंवा कळत असून कबूल करवत नाही की ज्ञान हें कधीच निखालस नसतं, सत्य कधीच अंतिम नसतं. कोणच्याहि एका माणसाला जेवढं कांही माहित असतं त्यापेक्षा किती तरी अधिक माहीत झालेलं नसतं. जी गोष्ट एका व्यक्तीची तीच समाजाची, युगाची. म्हणूनच एखाद्या व्यक्तीला, युगाला अथवा समाजाला ज्ञात असलेलं ज्ञान म्हणजे खरोखरच एक पद्धतशीर योजनाबद्ध अज्ञान होय, आणि यामुळेच कुणाहि माणसानं कशावरहि बोलावं, मतप्रदर्शन करावं, असं मला वाटतं. फार तर काय होईल ? आपल्यापेक्षा जो जास्त जाणतो त्याच्यापुढें आपण उघडे पडूं. थोडा वेळ आपलं हसूं होईल. " वरणांत तिखट जास्त पडलं आहे " असं म्हणण्या ऐवजी " वरणांत मसाला फार झाला आहे " असं आपण म्हणूं व थोडा वेळ आपल्याला या विषयांत खरोखरच किती कळतं हें जाहीर होईल. पण

अनुक्रमणिका

हळूहळू आपल्याला कळूं लागेल. त्याऐवजी आपण तज्ञ होण्याची वाट पहात असलों तर मला वाटतं तोंड उघडायची कधी पाळीच येणार नाही. ज्ञानाचें त्या प्रकारचे तज्ञ होईपर्यंत बोलायचं नाही असं जर कुणी ठरवलंच तर त्याच्या दृष्टीनं दोनच आदर्श आहेत. एक पद्मासन घालून बसलेली बुद्धाची मूर्ति किंवा इजिप्तमधले स्फिंक्सचे पुतळे. जिवंत माणसांनी बोललं पाहिजे, वादविवाद केला पाहिजे, हरलं पाहिजे, स्वत:चं हसूं करून घेतलं पाहिजे, चुका केल्या पाहिजेत. हें सगळं करत असतांना फाजील विनयाची मला मुळीच आवश्यकता दिसत नाही. विद्या विनयानं शोभते या वचनांत कोणतं तर्कशास्त्र लपलेलं आहे हें मला तरी कळत नाही. अविद्या विनयानं शोभते असं जर कुणी म्हणालं तर तें मी समजूं शकेन. पण विद्या आणि विनय या जोडातं अनुप्रासापेक्षा विशेष अलंकार मला दिसत नाही. विणकामाबद्दल बोलतांना, स्वयंपाकाबद्दल बोलतांना, इतर अनेक विषयांबद्दल बोलतांना मी विनयशील असतों. कारण ते मला नीट समजत नाहीत. पण माझ्या विनयाची परमावधी मी मूकव्रतांत केली तर मला लोक विनयी म्हणतील; कदाचित् विद्वानहि म्हणतील. मी लोकांना आवडणार मात्र नाही हें नक्की. मी बोलावं आणि कांही चुका कराव्या अशीच माझ्यावर प्रेम करणाऱ्यांची इच्छा असणार. त्यांतच माझ्या सुधारणेला जागा आहे; मी एक चुका करणारा प्राणी आहे, म्हणजेच माणूस आहे या समजुतीलाहि जागा आहे, जे चुका करीत नाहीत ते पुतळे होत; तीं माणसं नव्हेत; तीं यंत्र होत. अशा माणसांना यंत्र न म्हणतां देव म्हणायची फार पुरातन पद्धत आहे. चुकांच्या पलिकडे असलेल्या देवाची कल्पना करण्यांत विनयाऐवजी मला अहंकाराचाच भाग जास्त दिसतो. म्हणूनच माणसांसारखे वागणारे जे अनेक देव आमच्या पुराणांत आढळतात ते मला सर्वज्ञानी, सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान देवापेक्षा अधिक आवडतात. आमच्या अनेक देवांना मनुष्यरूप देण्यांत आमच्या पूर्वजांनी शहाणपणा दाखवला तो मला आवडतो. देवाला कधी बाप तर कधी आई, कधी मित्र तर कधी विरोधी म्हणून आळवणाऱ्या व प्रसंगी त्याला शिव्या देणाऱ्या संतांची कविता मला आवडते. देवाला सर्वज्ञानी समजाणाऱ्या लोकांचा अहंकार मात्र मला तावडतीव खटकतो; इतिहासालाहि तो खटकला हें वाचून मला आनंद होतो; अशा अहंकारी पुरुषांना त्यावेळच्या समाजानं शिक्षा केल्या तेंच बरं झालं असं मला वाटतं.

सॉक्रेटिसाला विष देण्यांत आलं याबद्दल मला मुळीच वाईट वाटत नाही. सॉक्रेटिसाला त्याचा ज्ञानामुळे मरावं लागलं या गोष्टीवर माझा विश्वास नाही. मी ज्या अहंकारी लोकांबद्दल लिहित आहें त्या अहंकारी लोकांचा तो म्होरक्या होता. सॉक्रेटिसपेक्षा अधिक जाणणारे लोक, आणि तरीहि अधिक चुका करणारे लोक त्यावेळीं पुष्कळ होते. पण सॉक्रेटिसाइतके ते अहंकारी नव्हते. ते एकमेकांशी वादविवाद करीत, विरोध करीत, एकमेकांना हाणून पाडण्याचा प्रयत्न करीत, एकमेकांचीं व्यंगचित्रं काढीत. जों पर्यंत त्यांचा वादांत पराभव होत नसे अथवा नवीन माहिती प्रकाशांत येऊन त्यांना आपल्या चुका कळत नसत तोंपर्यंत ते आपल्या ज्ञानाचं प्रदर्शन मांडीत. या सगळ्या प्रयत्नांत त्यांचं अज्ञान प्रगट झालंच तर ते खट्टू होत, खजील होत, पराभूत होत आणि पुन्हा आपल्या उद्योगाला लागत. सॉक्रेटिसाचं तसं नव्हतं. "आपल्याला कांही कळत नाही" हेंच तो सगळ्यांना सांगत सुटला. मला कांही समजत नाही एवढंच समजतं असं रस्त्यारस्त्यांतून, बाजारा-

बाजारांतून सिद्ध करीत सुटणारा, बडबडत सुटणारा हा माणूस केवढा अहंकारी असला पाहिजे ? मी अज्ञानी आहें एवढंच ज्ञान मला झालं आहे हें त्याचं म्हणणं कदाचित् बिनचूक असेल. पण इतकं बिनचूक बोलण्याची त्याला आवश्यकता तरी काय होती ? अज्ञानाची कबुली देण्यांत नम्रतेपेक्षा त्याचा उद्दाम अहंकारच जास्त होता. स्वतःच्या अज्ञानाची कबूली देतां देतां इतरांच्या अर्धकच्च्या ज्ञानाची खिल्ली करणं व इतरांना तुच्छ लेखणं हाच त्याचा उद्देश असावा. जगाला तुच्छ लेखणारा एक शिष्यवर्ग तो उत्पन्न करूं पाहत होता आणि म्हणूनच त्याला शिक्षा झाली.

सदा सत्य बोलणारे, नेहमी बिनचूक बोलणारे इत्यादि सर्व लोक अहंकारी असतात; जगाची त्यांना किंमत वाटत नाही. त्यांची ही तुच्छ वृत्ति कोण सहन करणार ? या अहंकारी तुच्छ वृत्तीवर उपाय एकच आणि तो म्हणजे चुका करणं, चुका करतांना पकडलं जाणं. चुका करणारी माणसं जगाला परवडतात. स्वतःच्या चुकांचा वारंवार पाढा वाचणारा एखादा नेता जनतेचा विश्वास हमखास संपादन करतो. कारण त्याचा अहंकार लोकांना जाचत नाही; त्याच्या वागण्याबोलण्यांत तुच्छता येत नाही. चुका होऊं नये म्हणून धडपडणारा व चुका करणारा माणूस किंचित् हास्यास्पद ठरला तरी त्या हास्यांत कटुता नसते, विखार नसतो. एखादं गमतीदार नाटक पहातांना हसावं तसे लोक त्याच्या बोलण्यावागण्याला निर्मळ मनानं हसतात. एका मोठ्या मराठी कादंबरीकाराबद्दल सांगतात की स्त्रियांच्या उंची तलम साड्यांचीं वर्णनं नीट करतां यावीं म्हणून तो साड्यांचा ढीग हाताळून पाही. साड्यांच्या तलम स्पर्शाचा अनुभव यावा म्हणून एकदोन साड्या त्यानं नेसून बघितल्या असल्या तरी मी कटुतेनं त्याला हसलें नसतें. माझी खात्री आहे की त्याच्या वर्णनांत चुका असतील, अपुरेपणा असेल. तरीहि त्यांत उपहास करण्या-सारखं कांही नाही. त्याच्या चुका त्याच्या लक्षांत आल्या तर पुढे त्या निघून जातील; इतरांच्या लक्षांत आल्या तर इतरांना फायदा होईल. त्याच्या चुकांमुळे शहाणे होऊन इतर लोक त्या चुका करणार नाहीत; नवीन चुका करतील.

क्रिकेट, वाङ्मय, चित्रपट, संगीत इत्यादिंबद्दल अर्धवट ज्ञानानं बोलणारे लोक पाहिले की कांही ज्ञानी माणसांना राग येतो. मी अशा बिनचूक लोकांतला नव्हे. इतरांच्या अर्धवट ज्ञानानं कधी माझी करमणूक होते; तर कधी माझं ज्ञान आहे त्यापेक्षा वाढतं, माझ्या चुकांचा इतरांना असाच फायदा व्हावा अशी माझी इच्छा आहे. म्हणूनच मी माझ्या अज्ञानाची मूठ नेहमी उघडी ठेवायचा प्रयत्न करीत असतें. या प्रयत्नांत माझं ज्ञान कधी कधी वाढतं असं मी म्हणालें तें अगदी खरं आहे. वीणकाम, भरतकाम, पाककला इत्यादींची माझी माहिती आता पूर्वीपेक्षा बरीच सुधारली आहे. या बाबतींत बोलतांना दिवसें दिवस मी नवीन नवीन चुका करीत असतें; जुन्या चुका करीत नाही. माझ्या कांही चुका पचतात. चुक म्हणून जें बोलायला जातें तें कधी बरोबर ठरतं. एखाद्या वेळीं माझ्या चुका उघडकीलाहि येतात आणि ऐकणारे माझ्यावर क्षणभर चिडतात; कांही वेळ मला हंसतात, पण पुन्हा माझं मत विचारतातच. एखादे वेळीं फार मोठं अज्ञान प्रगट झालं आणि मी पकडला गेलें तर माझ्यावर बाजू शेकते. पण याबाबतींत माझी वृत्ति एका गुन्हेगारासारखी आहे. त्यानं पांच खून पचवले. पण सहाव्या खुनांत पकडला गेला आणि खुनाशीं संबंध असल्याच्या आरोपावरून त्याला आठ

वर्षांची शिक्षा झाली. शिक्षा ऐकल्यावर तो स्वतःशींच साळसूदपणं म्हणाला, "यापूर्वी पांच भयंकर खून केले तेव्हा मला कांही झालं नाही आणि आता या सहाव्या खुनाशीं नुसता संबंध आहे म्हणून फुकटांत आठ वर्षं जावं लागत आहे". त्याच्या म्हणण्यांतील 'फुकटांत' या शब्दाचा आशय मला नीट कळला आहे हें काय सांगायला हवं ?

'संमोहाचे हे पट विरले'

सौ. मनोरमाबाई नावलेकर

हा मन गंगा खळखळ वाही
ह्या हृदय सागराते गाई ॥धृ०॥

हृदय सागरा, आत्मारामा
स्वयं प्रकाशित पसरे सुषमा
उद्धरि जीवन, मनो विरामा
हे शांति पद्म नत नित होई ॥१॥

प्रेम सुधाकर, शीतल किरणीं
वर्षा करि, अविरत फुलवोनी
वृत्ति रंगली, भृंग होउनी
मग भान कशाचें, जगी राही ॥२॥

अननुभूत सात्विक फुलवेली
कडे कडेनी, फुलली, हसली
पुष्पांजली, नकळत अर्पीयली
नकळत, वृत्ती चिन्मय होई ॥३॥

अमित वैभवीं जीवन नटलें
कुबेर वैभव, थोटें गमलें
संमोहाचे हे पट विरले
भांडार मोद, अगणित वाही ॥४॥

विदर्भ साहित्य संघाचें सीमोल्लंघन

गो. मो. रानडे

*

यंदा मेच्या दि. ३, ४, ५ ला वि. सा. संघाचें १४ वें अधिवेशन जबलपूर येथे भरणार आहे. विदर्भ व जबलपूर हीं दोन नांवें एकत्र आणणें म्हणजे वदतोव्याघाताचा अर्थ प्रत्यक्ष पद्धतीने देण्यासारखें कित्येकांना वाटण्याचा संभव आहे. जबलपूरसह महाकोशलमधील अनेकांच्या मनांत या संमेलनासंबंधी एक भलेंमोठें प्रश्नचिन्ह अंकित झालें आहे. 'विशिष्ट राजकीय हेतूंच्या सिद्धीचें तें एक माध्यम आहे' असें काहींना वाटतें तर कांहींच्या दृष्टीने हें होऊं घातलेलें संमेलन म्हणजे प्रांतिकतेची चिघळलेली जखम आहे. हिंदी मराठी मिश्र समाजाच्या या जबलपूर शहरीं उघडया कानाने वावरणाऱ्यांना असल्या गोष्टी ऐकण्याचे प्रसंग आले आहेत. परंतु निदान राजकारण अथवा सांप्रदायिकतेपासून अलिप्त असा बहुजनसमाज तरी या संमेलनाविषयी आस्थेवाईकपणे बोलणारा असावा ही वाजवी अपेक्षा देखील पूर्ण होत नाही. 'साहित्याशी आमचा कांहीच संबंध नाही' या अज्ञानजन्य समजुतीची अभिव्यक्ति प्रामाणिक असून समाजाच्या साहित्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोणाची द्योतक आहे. म्हणूनच ती उपेक्षणीय नाही. याबरोबरच आणखीहि एक सूचना चिंत्य आहे. ती समाजाच्या दुसऱ्या एका थरांतील काही व्यक्तींकडून उच्चारल्या जाणाऱ्या व किंचित दर्पयुक्त भासणाऱ्या 'केवळ ठराव पास करून कांही अभिजात साहित्य निर्माण होत नसतें' या वाक्यांतून अप्रत्यक्षपणे मिळणारी आहे. साहित्य संमेलनासंबंधी उपस्थित होणाऱ्या अनेकानेक शंकाकुशंकांचा योग्य विचार होऊन त्यांचें समाधान करण्याची जबाबदारी या संमेलनावर आलेली आहे. पहिलीं दोन मतें स्थलकायमर्यादित तर नंतरचीं दोन्ही स्थल-कालातीत आहेत. जबलपूर येथे भरणाऱ्या "विदर्भ साहित्य संघा"च्या अधिवेशनांत या सर्व समजुतींचा योग्य परामर्ष घेतला जाणें औचित्यपूर्णच नव्हे तर अत्यंत आवश्यक होऊन बसलें आहे.

धर्म–अधर्म–निरपेक्षतेचा प्रश्न राज्य पद्धतीच्या बाबतींत उद्भवत असला तरी साहित्याच्या क्षेत्राचा अमर्यादव्याप पाहतां त्याला धर्म-जाति-भाषा हीं भेदांचीं कुंपणें घालू पाहणें हास्यास्पद होण्याचा संभव आहे. साहित्य सृजन हें सर्वव्यापी मानव्याच्या आंतरिक जाणीवेच्या स्वाभाविक परिस्फुटतेखेरीज दुसरें काय आहे ! मानव आणि इतर पशु यांत भेद दाखविणाऱ्या हास्यादि वैशिष्ट्यांपेक्षा मानवाला ग्रथित करणारें अत्यंत प्रबल सूत्र म्हणजे साहित्य. या उच्चतर दृष्टीने पाहिल्यास विदर्भाचें साहित्य संमेलन येथे महाकोशलमध्ये कां व्हावें या प्रश्नाचें आपोआपच निराकरण होतें. संपूर्ण मध्यप्रांतांत प्रातिनिधिक अशी मराठी साहित्य संस्था आज विदर्भ साहित्य

संघाशिवाय इतर कोणतीहि नसल्याने असल्या सीमा तिच्या संचाराला घालणें निव्वळ कोतेपणाचें ठरणार आहे. उलट, दुभाषी प्रान्त या दृष्टीने हिंदी व मराठी या दोन्ही भाषा भगिनींनी निःसंकोचपणे एकमेकीकडे जात येत राहण्यानेच आत्मीयतेची अभिवृद्धि होणें शक्य आहे. अलीकडे राजकीय अथवा सांप्रदायिक हेतूंची 'लेबलें' चिकटवून कुठल्याहि जीवनोपयोगी गोष्टींची विल्हेवाट लावण्याची जी 'फॅशन' निघाली आहे तिचा परिणाम इतर फॅशन्सना बळी पडून जितका अनिष्ट होतो तितकाच होणार हें निश्चित आहे. महाकोशल सारख्या हिंदीप्रधान भागांत मराठी भाषा व महाराष्ट्रीय संस्कृतीची जोपासना व अभिवृद्धि आम्ही जी अनेक साधनें जुळवून करीत आहोंत त्यापैकीच एक महत्वाचें साधन म्हणून जबलपूर येथे भरणाऱ्या विदर्भ साहित्य संमेलनाकडे पाहण्याचा समंजस दृष्टिकोण महाकोशलवासी महाराष्ट्रीयांचा असणें आवश्यक आहे. मराठी भाषेच्या असल्या सोहळ्यांची आम्हाला आर्त लागावी व साहित्य विषयाच्या अध्ययनाची पोटतिडीक आमच्यांत उठावी हें स्वाभाविक आहे. हिंदी भाषीयांनी या संमेलनाचें स्वागत आपल्या घरीं येणाऱ्या अभिन्न आप्ताच्या स्वीकाराप्रमाणे करणें हें भारतीय आतिथ्यशीलतेचा त्यांच्यावर कितपत संस्कार झाला आहे याचें प्रात्यक्षिकच ठरणार आहे. हिंदी व मराठी भाषांच्या सलोख्याच्या व्यवहारांतच दोन्ही समाजांच्या पारस्परिक सहनशीलतेची व समजूतदारपणाचीं बीजें आहेत आणि या कार्याचें जबाबदारपणे धुरीधरण साहित्यिकांवाचून इतर कोणी करूं शकणारहि नाही. या दृष्टीने पाहतां आपली साहित्यनिर्मिति अधिकाधिक समाजाभिमुख, लोकोपयोगी व जीवन-पोषक करीत जाण्याची दक्षता साहित्यिकांनी बाळगावी अशी अपेक्षा करणें औचित्याला सोडून होणार नाही. "आमचा साहित्याशी काय संबंध?" असें विचारण्याची जनसाधारणावर पाळी यावी यांत सध्याच्या साहित्य निर्मितींतील उणीवांचा, तिच्या हेतूच्या अपुरेपणाचा व साहित्यिकांच्या पराभवाचा स्पष्ट ठसा उमटलेला दिसतो. "साहित्य आणि समाजजीवन" हा यापुढे निव्वळ चर्चेचा विषय न राहतां त्या परस्परपूरक व अभिन्न गोष्टी असल्याचा समाजाला साक्षात् अनुभव येणें आवश्यक आहे. 'ठराव पास करून नव्हे' तर 'प्रत्यक्ष लिहूनच' अभिजात लिखाणा-संबंधीच्या ठरावासाठी तोंड न उघडण्यानेच तसल्या आरोपांचीं तोंडें बंद होणार आहेत.

साहित्य संमेलनें अनेक झालीं व पुढेहि होतील परंतु त्यांतून सर्वसाधारण समाजाला स्फूर्तीचे कण, जीवनाचा अवसेक, 'तुष्टिपुष्टि' इ. साहित्यांत गाजलेल्या स्थितींचे तुषार अथवा 'सत्यसौंदर्याची' दृष्टिभेट इत्यादींचा कितपत लाभ होतो याचा आढावा घेण्याची वेळ आलेली आहे. जबलपूर सारख्या बृहन्महाराष्ट्राच्या सीमेवरील हिंदीप्रधान भागांत यंदाचें हें विदर्भ साहित्य संघाचें अधिवेशन भरणें श्री. माडखोलकर म्हणतात, त्याप्रमाणे जर खऱ्या अर्थाने सीमोल्लंघन ठरावें असें वाटत असेल तर या संमेलनांत वर उपस्थित केलेल्या सर्वस्पर्शी प्रश्नांचाहि समाधान-कारक निकाल लावून घेतला पाहिजे. त्यांतच पारंपारिकतेचें सीमोल्लंघन केल्याचें श्रेय विदर्भ साहित्य संघाच्या वाट्याला येणार आहे.

मराठीची प्रतिष्ठा व सन्मान राखण्याच्या दृष्टीनेहि या संमेलनांत प्रयत्न होणें आवश्यक आहे. एकंदरीत महाकोशलमध्ये मराठींतून शिक्षणाची सोय यथातथाच

आहे. सागर विद्यापीठाने मराठी विभागाला स्थान देऊन औदार्याचें अल्प प्रदर्शन केलें असूनहि गेल्या दोन वर्षांपूर्वी स्थानिक जैन महाविद्यालयाने मराठी विषयाचा अंतर्भाव आपल्या शिक्षण क्रमांत करीपर्यंत येथे मराठी शिक्षणाची व्यवस्था व्हावी अशी मागणी झाल्याचें ऐकिवांत नाही. अर्थातच आमच्यांत या प्रश्नासंबंधीचा जिव्हाळा असल्यास तो उघडपणें बोलून दाखविण्याची संधि या संमेलनाने आणून दिलेली आहे. आस्था नसल्यास ती समाजांत निर्माण करण्याचें दायित्व संमेलनाने स्वीकारलें तरी मोठें कार्य झाल्यासारखें होईल.

जबलपूरचें हें संमेलन आणखीहि अनेक दृष्टींनी महत्वाचें आहे. हिंदी-मराठी साहित्यिकांचा परस्पर परिचय आणि साहित्यप्रणालींविषयीं विचार विनिमय होऊन दोन्ही भाषांचें हें स्नेहार्द्रसंमेलन ठरणार आहे. हिंदी व मराठी साहित्यिक एकत्र येऊन त्यांचें संमिश्र काव्यपठन, चर्चादि कार्यक्रम ' गोष्ठी ' रूपाने होणार आहेत. शिवाय सर्वसाधारणांच्या माहितीसाठी हिंदी व मराठी वाङ्मयाच्या विविध शाखांचा विकास दाखविणारीं संक्षिप्त भाषणें दोन्ही भाषांतील साहित्यिक करणार आहेत. वैचारिक आदानप्रदानाचा हा कार्यक्रम भाषिक समन्वय व सलोखा निर्माण करण्यास उपयोगी पडेल असा विश्वास आहे. आमचा मराठा बोल ' अमृतातेंहि पैजा ' जिंकणारा असून 'आम्ही सुधा ते काकवी' असल्याच्या दर्पयुक्त जाणवेने हे कार्यक्रम आपण ठेवलेले नाहीत, स्पर्धेच्या भावनेचा त्यांत सर्वस्वी अभाव आहे व उपहास—बुद्धीचा आमच्यांत गंधहि नाही ही गोष्ट हिंदी साहित्यिकांशी होणाऱ्या आमच्या व्यवहाराने या संमेलनांत आम्ही सिद्ध करणार आहोत.

संमेलनाच्या महावस्त्रावर प्रदर्शनाचा कलाबतू असलाच पाहिजे ही एक परंपरागत रूढी होऊन बसलेली आहे. त्या दृष्टीनेहि जबलपूर संमेलन आपलें वैशिष्ट्य राखील अशी आशा आहे. कल्चुरी, परमार इत्यादि अतिप्राचीन व महाराष्ट्रीय, गोंड इ. मध्यकालीन राजघराण्यांच्या उत्थानपतनाच्या रोमांचकारी इतिहासाचे पडसाद उमटविणारे अनेक भग्नावशेष जबलपूरला व्यापून आहेत. येथील प्राचीन संस्कृतीचा व नर्मदाविभागीय वैशिष्ट्यांचा परिचय करून देणारें सांस्कृतिक प्रदर्शन येथील संमेलनाप्रसंगी भरणार आहे. त्यांत केवळ नाजुक व दिखाऊ कलाकुसरीचीं कामेंच राहणार नसून दगडाधोंड्यांतून, खापरांच्या तुकड्यांतून व गंजलेझिजलेल्या धातूच्या वस्तूंतून शेकडों वर्षांच्या सांस्कृतिक इतिहासाचा चित्रपट पहावयास मिळणार आहे. सध्या त्रिपुरी येथे उत्खनन करीत असलेले डॉ. दीक्षित, म. म. प्रिं. मिराशी, डॉ. कटारे, डॉ. य. खु. देशपांडे, श्री. वासुदेवराव सुभेदार प्रभृति नामवंत विद्वानांच्या प्रेरणा या संमेलनांत वावरतांना दिसतील. गोंडवाना हे या भागाचें पाळण्यांतलें व अपरिष्कृत नांव. त्या नांवात काय आहे याचें मूर्तिमंत दर्शन घडविणारा मंडल्याच्या वनवासीसेवा मंडळांतील गोंड मुलामुलींचा लोक—नाट्य—नृत्य—गीताचा कार्यक्रम हेंहि येथलि संमेलनाचें एक वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. स्थानिक कलावंतांतर्फे दोन गाजलेल्या मराठी नाटकांचे प्रयोग होणार आहेत. शिवाय भातखंडे संगीत महाविद्यालयाकडून होणारा संगीताचा कार्यक्रमहि अपूर्व होण्याचा संभव आहे. अमीर खुसरोपासून आजतागायत हिंदुस्थानी संगीत पद्धतीचा होत गेलेला विकास मराठींतील पोवाडा, लावणी व भावगीत या वैशिष्ट्यपूर्ण प्रकारासह या कार्यक्रमांत प्रात्यक्षिक व समालोचन पद्धतीने प्रस्तुत करण्यांत येणार आहे. प्रतिनिधी

वं पाहुणे यांना जबलपूरच्या आसमंतांत विखुरलेलीं भेडाघाट इ. प्रेक्षणीय स्थळेंहि माफक दरांत दाखविण्याची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. रेलवे कन्सेशन मिळविण्याचा प्रयत्न चालूं असून त्याला यश येण्याचा संभव आहे.

प्रत्यक्ष संमेलन व इतर कार्यक्रम गोलबाजार भागांत असणाऱ्या महाराष्ट्र विद्यालयांत होणार असून प्रतिनिधींच्या निवासाची व्यवस्था जवळच महाकोशल विद्यालय या महाराष्ट्र हायस्कूलच्या हिंदी विभागांत केलेली आहे. थोड्याच अंतरावर जेवणाखाण्याची सोय करण्यांत आलेली आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने आंथरुणापांघरुणाच्या बाबतींत विशेष अडचण भासणार नाही. परंतु येणारांनी मच्छरदाण्या न विसरतां आणल्यास बरें.

प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली येथील संमेलन भरणार असून नामदार काकासाहेब गाडगीळ हे संमेलनाचें उद्घाटन करणार आहेत. सांस्कृतिक प्रदर्शनाचें उद्घाटन डॉ. दीक्षित यांच्या सारख्या सुप्रसिद्ध उत्खनन शास्त्रज्ञाच्या हस्ते होणार आहे. अशा वैशिष्ट्यांनी युक्त असलेलें हें संमेलन महाकोशल विभागांत प्रथमच होत आहे. मराठी भाषी जनतेने संमेलन यशस्वी करण्या साठी झटून मातृभाषेच्या महोत्सवांत उत्साहाने भाग घेणें औचित्यपूर्णच ठरणार नाही काय ?

अमरावती शाखेची निवडणूक

वि. सा. संघाच्या अमरावती शाखेची निवडणूक गेल्या महिन्यांत होऊन पुढील पदाधिकारी निवडून आले आहेत—

अध्यक्ष— श्री. ना. रा. वामणगांवकर
उपाध्यक्ष— ,, द. शं. फडके
प्रा. मा. ल. व्यवहारे
चिटणीस— श्री. नारायणराव तांबी
सहचिटणीस—कु. वनमाला देशमुख
श्री. रामरंजन जाजू
सभासद— प्रा. निजसुरे; श्री. म. वा. देवघरे;
श्री. श्री. स. पंढरकर; श्री. किशोर दिघेकर;
प्रा. ग. त्र्यं. देशपांडे; श्री. एम्. के. शहा आणि
सौ. शकुंतला देशपांडे

वि. सा. संघाच्या का. का. मंडळाचे सभासद श्री. के. दे. देशपांडे हेहि अधिकारपरत्वे या का. का. मंडळाचे सदस्य राहतील.

—रा. पु. सगदेव चिटणीस वि. सा. संघ

जबलपुरांतील मराठमोळ्याचें समाज-जीवन

बापू अडावदकर

*

जितकें आपण स्वप्रांतापासून दूर असतों तितकीच आपली आपलेपणाची मर्यादा वाढत असते. सहकार्य, परस्पराविषयीं वाटणारी सहानुभूति, सामाजिक कार्याची कळकळ व त्यागाची तयारी, यामुळे निरनिराळ्या संस्था निर्माण होतात; टिकतात व स्वतःच्या प्रगतीबरोबर समाजाची प्रगती साधण्यास कारणीभूत होतात.

जबलपूर शहरांत अजून मराठी वाङ्मयाविषयी जरी म्हणण्यासारखी प्रगति झाली नसली तरी मराठी भाषेविषयी, ती टिकविण्याकरितां प्रयत्न वेळोवेळी झाले असून याच भूमिकेतून मराठी वाङ्मयाविषयीं जास्तींत जास्त माहिती मिळवावी, आपण 'कांही तरी कां होईना' पण करावें अशी कल्पना विशेषतः उत्साही तरुण व्यक्तींच्या मनांत येऊं लागली व त्या कल्पनेला मूर्त स्वरूप 'मराठी साहित्य संघा'च्या रूपाने प्राप्त झालें.

ही इच्छा आपोआप निर्माण झाली नाही. मराठी साहित्य संघ स्थापन झाला तो एक ऐतिहासिक गरज या नात्याने ! विविध शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक व भाषाविषयक निरनिराळ्या संस्था या ठिकाणी निर्माण झाल्यात; त्यांनी केलेल्या अविरत कार्यामुळे ही गरज निर्माण झाली. तेव्हां अशा संस्थांची माहिती या वेळीं देणें योग्य ठरेल.

महाराष्ट्र विद्यालय जबलपुरांतील आखिल महाराष्ट्रीय चळवळीचें केन्द्र आहे. जबलपुरांत रहाणारा प्रत्येक मराठी इसम वर्षांतून एकदा तरी महाराष्ट्र विद्यालयांत येतो असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाही. महाराष्ट्र विद्यालयाची स्थापना १९२८ साली निव्वळ मिडिल स्कूलच्या स्वरूपांत झाली. आज विद्यालयाच्या इमारतीकडे बघून किंवा महाराष्ट्र शिक्षण मंडळाच्या वाढत्या कार्याचा व्याप ध्यानांत घेतां या संस्थेने जबलपुरांतील महाराष्ट्रियांमध्यें एकजिनसी वृत्ती व आपलेपणा कसा निर्माण केला आहे, हें स्पष्ट कळूं शकेल. १९१७ सालीं मराठी भाषा टिकते कीं नाही हाच मुख्य प्रश्न होता. कै. लिमये व कै. करमरकर यांच्या प्रयत्नामुळे निघालेल्या मराठी प्रायमरी शाळेचें कार्य महाराष्ट्र विद्यालयाने पुढे चालूं ठेवलें. आज जबलपुरांत ज्यांना वक्ते, गायक, कलाकार अथवा लेखक म्हणतां येईल, अशी तरुण मंडळी याच महाराष्ट्र विद्यालयांत शिकलेली, याच विद्यालयांतील वातावरणामुळे व सांस्कृतिक चळवळीमुळे स्फूर्ती पावलेली आढळतील. विशेषतः

मराठी वाङ्मयाविषयी आस्था निर्माण करण्याचें श्रेय रा. घिरणीकर, रा. रानडे, रा. द. कृ. पाटक, रा. पिंपळे व रा. वि. कृ. देशपांडे या शिक्षकवर्गासच द्यावें लागेल. या विद्यालयांतील शारदा मंडळातर्फे होणारे वादविवाद व इतर उत्सव पाहिले म्हणजे खरोखर जर या विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण व मार्गदर्शन प्राप्त झालें तर यातूनच उत्तमोत्तम लेखक व कलाकार निर्माण होऊं शकतील या बद्दल शंका वाटत नाही. शारदा मंडळ ही संस्था महाराष्ट्र विद्यालयांतील विद्यार्थ्यांनी चालविलेली नमुनेदार संस्था आहे. या संस्थेच्या कार्यामुळे महाराष्ट्र विद्यालयांत प्रथम फलकवृत्तपत्राची प्रथा चालू झाली व ती अजुनहि चालू आहे. 'आव्हान' 'वार्ता' 'जागृति' 'भरारी' 'शारदा' वगैरे वेगवेगळीं नांवें या साप्ताहिक वृत्तपत्रांनी वेळोवेळी धारण केलीं. महाराष्ट्र विद्यालयांत हस्तलिखितांची चुरसच असते. प्रत्येक वर्ग व ज्यांना लिहिण्याची धडपड करावीशी वाटते असे विद्यार्थी वेळोवेळी हस्तलिखितें प्रसिद्ध करतात. यापैकी बरोंचशीं जरी वाङ्मयदृष्ट्या कमी दर्ज्याचीं ठरलीं तरी विद्यार्थ्यांच्या भावनेचें व किशोरांच्या विचारांचें उत्तम प्रतीक ठरण्यास हरकत नाही. महाराष्ट्र विद्यालयांतहि विविध चळवळींचें मुख्य श्रेय भूतपूर्व मुख्याध्यापक रा. रा. बाबुराव ओक याकडे असलें तरी रा. रा. काकासाहेब लेले यांच्या सहानुभूतीमुळे या चळवळी प्रगतीच्या मार्गावर आहेत. याच महाराष्ट्र विद्यालयाच्या चळवळींतून श्री. लोणकर, श्री. शांताराम मुसके, श्री. ताम्हणकर, श्री. बापू अडावदकर, श्री. पंढू रानडे, श्री. प्र. ना. तासकर, श्री. प्रभाकर खंडकर, प्रा. चान्सरकर, कु. सरोजिनी मराठे, कु. मैना वेडेकर, सौ. पिंगळे, सौ. देव व कु. तारा खेर यासारखे वक्ते, कार्यकर्ते व कला अभिरुचि असणारे या शहरास लाभले आहेत.

हेंच कार्य पुढें चालविण्याचा प्रयत्न या शाळेंतील विद्यार्थी महाविद्यालयांतून करतात हितकारिणी महाविद्यालय, महाकोशल महाविद्यालय, प्रांतीय शिक्षण महाविद्यालय, दा. ना. जैन महाविद्यालय व महिला महाविद्यालयांत मराठी वाङ्मय मंडळें कार्य करतात. या मंडळांचा वाङ्मयाशी संबंध नांवापुरताच असतो. याचें कारण दा. ना. जैन व महिला महाविद्यालयाव्यतिरिक्त इतर कोठेहि, वारंवार मागणी करूनहि मराठी विषय शिकविला जात नाही. या वाङ्मय मंडळांत हितकारिणी महाविद्यालयाचें स्थान प्रमुख असतें. या मंडळांतर्फे सौ. विमलाबाई देशपाण्डे, श्री. पु. ल. देशपाण्डे व नवोदित कवि श्री शरच्चंद्र मुक्तिबोध इत्यादि प्रसिद्ध लेखक लेखिकांचीं भाषणें झालीं आहेत. नुकताच महाकोशल महाविद्यालयांत आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचा अंतर्भाव गेलीं दोन वर्षे करण्यांत आला आहे. यासाठी सौ. ताराबाई शब्दे यांनी पारितोषिकाच्या स्वरूपांत एक कप ठेवला आहे.

प्रांतीय शिक्षण महाविद्यालयांतील मराठी वाङ्मय मंडळाच्या कार्यास जबलपूरचें असें म्हणता येत नाही. महाविदर्भातून येणाऱ्या निरानिराळ्या व्यक्ति हें कार्य करीत असतात. त्यांचा दर्जा निःसंशय श्रेष्ठ असतो. गणेशोत्सवांत प्रांतीय शिक्षण महाविद्यालयातर्फे होणारीं नाटकें नाट्यकलेचें खरें स्वरूप दर्शविणारीं असतात. या कार्यास यश प्रा भावे, प्रा. बक्षी व प्रा. बोधनकर यांच्या प्रयत्नांमुळे व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या साहीत्यिक अभिरुचीमुळे प्राप्त होत असतें.

हितकारिणी महाविद्यालय व महाकोशल महाविद्यालयातर्फे निघणाऱ्या वार्षिकांमधे मराठी विभागास विशेष स्थान असतें. या विभागामध्यें वारंवार प्रसिद्ध झालेले

लेख कविता व निबंध पाहिल्यावर या सर्व गुणांचें योग्य संकलन व मार्गदर्शन करण्याची गरज पटते.

सागर विद्यापीठाने मराठी निबंध हा विषय इंटर व बी. ए. च्या विद्यार्थ्यांकरिता सुरू केल्यामुळे या दृष्टीने प्रगती होईल; विशेषतः मराठी साहित्य संघ या विद्यार्थ्यांचा योग्य उपयोग करून घेईल अशी आशा व दृढविश्वास वाटतो.

या शैक्षणिक संस्थांखेरीज इतर संस्था भाषाविषयक कार्य करीत असतात. यापैकी प्रमुख स्थान महाराष्ट्र वाचनालयास द्यावें लागेल. ही संस्था १९१३ साली ज्ञानवृद्धि व भाषावृद्धीच्या उद्देशाने स्थापन झाली. संस्था स्थापन करण्याचे कामी कै. अप्पासाहेब गोळवलकर, कै. रामभाऊ पेंडसे, प्रा. कानेटकर, रा. फडणीस, रा. खंडकर, श्री. गोविंदराव इर्डीकर यासारख्या अनेक व्यक्तींचें सहकार्य प्राप्त झालें आहे. हल्ली संस्थेचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब पंडित असून चिटणीस श्री. शांताराम मुसळे आहेत.

या वाचनालयांत आठ हजाराचे आसपास पुस्तकें असून सभासदांची संख्या दीनशे आहे. नवनव्या ग्रंथांची व नवनव्या विचारांची गरज हल्ली भासत आहे; पण त्याची पूर्ती आर्थिक परिस्थितीमुळे होऊं शकत नाही.

प्रांतीय शिक्षण महाविद्यालयाच्या व महिला उत्कर्ष मण्डळाच्या वाचनालयाचा उपयोग अभ्यासू व्यक्तींस करता येतो. वाङ्मय अभिवृद्धीस व विकासास आवश्यक अशा वाचनालयांची नितांत आवश्यकता आहे. या वाचनालयांनी मराठी भाषेतील पुस्तकें वाचण्याची आवड निर्माण केली व याच संस्था हीं नवीन गरज पूर्ण करतील अशी आशा आहे.

जबलपुरांतील महाराष्ट्रीय जनतेस एकत्र येण्याचे दोन चारच पण प्रमुख प्रसंग येतात. महाराष्ट्र विद्यालयाचें स्नेहसंमेलन वगळलें तर सार्वजनिक गणेशोत्सव, समर्थ सप्ताह, दत्त भजन मण्डळातर्फे होणारीं प्रवचनें व कीर्तनें हेंच ते प्रसंग! यापैकी सार्वजनिक गणेशोत्सव हा प्रसंग नमुनेदार व वैशिष्ट्यपूर्ण असतो. एकवेळ जबलपुरांत गणेशोत्सव मित्रमंडळ व महाराष्ट्र मंडळातर्फे होत असे पण हल्ली अखिल मराठी समाजाचा गणेशोत्सव एकच होत असतो. या सार्वजनिक उत्सवांतील सार्वजनिक व्यक्ति म्हणजे श्री. सुखारमे व श्री. दाभोळकर होत. या गणेशोत्सवांत इतर कार्यक्रमांबरोबर वादविवादाचा कार्यक्रम व भावगीतांचा कार्यक्रम नमुनेदार होत असतात. महाराष्ट्र समाजाने सार्वजनिक दसरा साजरा करण्याची प्रथा गेलीं कांही वर्षे चालू केली आहे.

खमरियाचें नाट्यमंडळ व त्याला लाभलेले रा. बाळासाहेब जोशी यांचे अनुभव महाराष्ट्र अॅमॅच्युअर ड्रॅमॅटिक क्लब व त्याला लाभलेले श्री. नानासाहेब जोशी यांचें सहकार्य, याचा उल्लेख करणें आवश्यक आहे. या संस्थांना दत्तात्रय भुसारी व श्री. दत्तात्रय लोणकर इत्यादि व्यक्तींचें सहकार्य वारंवार लाभत असतें.

इ. स. १९३४ साली स्थापन झालेल्या महिला उत्कर्ष मण्डळाचें अस्तित्व स्वतंत्र व महत्वपूर्ण स्वरूपाचें आहे. या संस्थेस स्वतःची इमारत असून वाचनालय, सहकारी भांडार, शिवण कलेचे वर्ग ही संस्था चालवीत असते. या संस्थेस श्री. मनोरमाबाई गोळवलकर, प्रसिद्ध कवयित्री सौ. मनोरमाबाई नावलेकर, तसेंच सौ. यमुनाबाई करंदीकर व सौ. रानडे यांचें सहकार्य वारंवार लाभत असतें. हल्ली संस्थेचें अध्यक्षपद सौ. केकरे याजकडे असून चिटणीसाचें कार्य सौ. मुळे करतात. ही संस्था सरकारमान्य आहे.

या संस्थेतर्फे 'उत्कर्ष' नांवाचें हस्तलिखित प्रसिद्ध होतें. याचें वैशिष्ट्य असें की यांत मराठी व हिंदी दोन्ही विभाग असतात. हस्तलिखिताचें कार्य सौ. मंदाकिनी मोने या पाहतात. याखेरिज इतर लेखिकांचें सहाय्य लाभतें तें वेगळेंच!

भारतखंडे संगीत महाविद्यालय ही जबलपुरांतील अभिनव संस्था आहे. श्री. स. भ. देशपांडे यांच्या निर्व्याजवृत्तीमुळे व कळकळीच्या प्रयत्नामुळे ही संस्था नांवारूपास आली आहे. प्रो. पंचभाई यांनी देखील या संस्थेस मदत असते. शास्त्रोक्त संगीताबद्दल, वाद्यवादन व नृत्यकला याबद्दल आवड निर्माण करण्याचें श्रेय याच संस्थेस आहे. या संस्थेमुळे श्री. बर्वे, कु. लीला फडणीस, कु. सरोजिनी मराठे व कु. कुमुद करंदीकर यासारखे प्रसिद्ध रेडिओ गायक व गायिका या शहरास लाभल्या आहेत. स्वतः श्री. देशपाण्डे व श्री. पंचभाई सुप्रसिद्ध रेडिओ गायक आहेत. या प्रसंगी पूर्वी जबलपुरांत असलेल्या व हल्ली ख्यातिप्राप्त झालेल्या श्री. राजाभाऊ कोगजे व सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक श्री. मधुकर गोळवलकर यांची आठवण आल्याखेरीज रहात नाही.

बदलत्या काळाबरोबर कार्यकर्तेहि बदलत असतात. निरनिराळ्या संस्थांमध्ये या शहरांतील तरुण मंडळीस अधिकाधिक भाग घ्यावसा वाटूं लागला आहे. त्यापैकी सामाजिक कार्यकर्ते म्हणून श्री. लोणकर, श्री. मुन्हार, श्री. सुखात्मे, श्री. ताम्हणकर, प्रा. गोविंदराव रानडे, प्रा. भावे इत्यादि मंडळींचा उल्लेख करणें आवश्यक आहे.

प्रा. वा. वि. भावे हे स्वतः लेखक असून खांडेकरांच्या मराठी कादंबऱ्यांचें हिंदीत रूपांतर करण्याचें महत्वपूर्ण कार्य त्यांनी केलें आहे. लिहिण्याची तळमळ असणाऱ्या व लिहिण्याची धडपड करणाऱ्या बऱ्याचशा तरुण व्यक्ति आहेत. मध्यंतरी श्री. शरचंद्र मुक्तिबोध येथे असतांना नाही म्हणता असा 'साहित्यिक चेव' येथील बऱ्याचशा तरुण मंडळीस आला होता. मराठी साहित्य संघ या दृष्टीने पुन्हा उत्साह निर्माण करूं शकेल, असें वाटतें.

सौ. मनोरमाबाई नावलेकर या जबलपुरांतील एकमेव ख्यातिप्राप्त साहित्य-सेविका आहेत. सौ. विजयाबाई जोशी, श्री. पंढ्र रानडे व श्री. अडावदकर यांना कविता करण्याचा व लेख लिहण्याचा नाद आहे. नवोदित लेखकांमध्ये विशेषतः विद्यार्थ्यांचा समावेश होतो व हे विद्यार्थी कॉलेजच्या अथवा इतर हस्तलिखितांमधून आपले लेख प्रसिद्ध करतात.

जबलपुरांत वक्ते मात्र भरपूर आहेत. याचें श्रेय वारंवार होणाऱ्या भाषण स्पर्धांना व वादविवादांच्या आयोजनास द्यावें लागेल. यापैकी प्रा. बोधनकर, प्रा. भावे, प्रा. बक्षी, प्रा. रानडे; श्री. श्रीकृष्ण ताम्हनकर, श्री. पंढ्र रानडे, श्री. कृ. दा. सप्रे, श्री. खंडकर, श्री. निळकंठ परांजपे, सौ. पिंपळे सौ. पिंगळे इत्यादि विशेष प्रसिद्ध आहेत.

कलाकारांमध्ये विशेषतः चित्रकलेमध्ये प्रमुख स्थान प्रांतीय शिक्षण महाविद्यालयाचे श्री. दत्तोपंत गोडबोले यास द्यावें लागेल. महाराष्ट्र विद्यालयाचे शिक्षक रा. ठोसर हे इंटरमिजिएट व ड्राइंगचे वर्ग चालवीत असल्याने या क्षेत्रांत विशेष अभिरुचि उत्पन्न होत आहे. तरुण कलाकारांमध्ये श्री. परांडेकर, पंडित, आत्माराम प्रधान व श्रीराम शेवडे वगैरे मंडळींचा प्रामुख्याने उल्लेख करतां येईल.

वरील विवेचनावरून जबलपुरांतील सामाजिक जीवनाचें धावतें अवलोकन करता येईल; जबलपूर जरी महाराष्ट्रापासून दूर असलें तरी आपलें मराठी वैशिष्ट्य टिकविण्याचें कार्य कशा प्रकारे विविध संस्था विविध क्षेत्रांत करीत आहेत, हें स्पष्ट होईल. भविष्य काळ तरुण मंडळींच्या उत्साहामुळे अधिक प्रगतीचा व सर्वांगीण उन्नतीचा होईल, याबद्दल विश्वास वाटतो.

अबोलीचें फूल

[मुक्तच्छंद]

प्राजक्ताच्या देठांपरी,
सशांच्या लाल डोळ्यांपरी,
अबोलीच्या फुलांपरी,
गुलमोहोराच्या दाट घोसांपरी,
आले तरारून भाव जे मनीं-ओठीं
त्यांची जाणीव-नेणीव कैशी !
महाकवीचे गंभीर आलवार
परी अर्थाच्या संध्याप्रकाशांतले उद्गार,
उषेच्या मेंदीचे जैसे रंग,
गानाच्या श्रुतिस्वरांचे तरंग,
कैसे श्रवावे, बघावे, आस्वादावे !
काय आणि कसें,
कधीं आणि किती,
बोलावे—ऐकावे
कान जिवाचे आणि शब्द करूनी !
—दुःखांचे हर्ष आणि आनंदाच्या कळा !
लोचनांच्या मृगाने आश्रमीं
आणिलें ओढुनी दुरी,
केले आणि तुझ्या पाठीं
मला शकुंतलेचा अली !
माझीं हीं चिमणीं रंगीन फुलपांखरें
आणि कमानदार, लाडक्या, विभिस्त खारी
मिषतें, दिसते-न दिसते नीलनील काजवे,
जुईचे, कुंदाचें नादमय गंध,-गंधमय भाव,
झेपावती, मुरकती, तरंगती, दर्वळती तुजभंवतीं !
हास्याची लाट तुझी
फेसाळत्या सागराच्या कंकणांतुनी !
स्पर्शाच्या तुझ्या खुणा—साक्षी
पांखरांच्या मऊमऊ परांतुनी !
रम्य कलेची प्रतीती
वल्लरींच्या डोलत्या अग्रांतुनी !
बोलांच्या गोडिवेंत ठिबके तव
डवरल्या अशोकाचा मरंद मधाळ !
प्यावी घटघटां प्रभा चंद्रिकेची,
आणि लोचनांची तुझ्या पिंग कांती !
कवळावी—मुरवावी तुझी गीती,
कवळावे—मुरवावे नबोलतां तुझे उमटले भाव—
आणि विरावें—विरावें दूर—दूर दिगंती !

बोल, कधीं बोलायाचें
' अबोलीचें फूल ' माझें ?
सांग, कधीं खुलायाचे
रंग माझ्या ' अबोलीचे ' ?

—अरविंद मंगरूळकर

★

दैत्य मस्तकीं

शय्येवरती दैत्य मस्तकीं
प्रमत्त होतां कामविकारें
तरळुनि गेलें नेत्रांपुढुनी
दृश्य विसंगत गूढ, अकल्पित, क्षणांत एका!
दिसलीं सदनें लहान मोठीं
जळूं लागलीं आणि धडधडां
उजेड पडला लाल तांबडा
चितांमधुन त्या आल्या धांवत हमरस्त्यावर
सुरेख तरुणी
फेडित वसनें जळती अपुलीं;
देहांपासुनि अलग होउनी
स्तनयुग्मांची गौर वर्तुळें
होऊं लागलीं भ्रमणीं वेढव!
तोफा अवजड जागोजागीं काळ्या प्रगटुनि
'धुडुम्' गर्जुनी फिरल्या मागें
खाउनि रंजक,
गोल खोलंगट सुमनें तांबुस
उडूं लागलीं धुरांतुनि त्या
कान झांकुनी थवे थबकले नग्न स्त्रियांचे!
वळण घेउनी आली पलटण वाजे पडघम
'उजवा डावा' उजवा डावा'
मधेंच 'सॅल्युट'
निराळाच तो
ओठ उंचवुनि मधलें एकच!
गिरक्या घेउन पडतां सुमनें टिपऱ्यांवरनी
फुटले पडघम
हंसले सोजिर जवान सगळे गाल फुगवुनी!!

—द. चिं. सोमण

१९५२
एप्रिल

अशीच राहो रात्र काजळी

दूधसागरा सारख्या
आपुल्या श्वेतधवल काये भवतीं
भावनांचें निळें उत्तरीय लपेटून
नर्तन करते आहे
आज माझ्या मनाच्या विराट रंगभूमीवर
सुखांच्या चांदण्यांची नभगंगा;
आणि तिच्या पदन्यासाने
मुखावून जातें आहे सारें अंगप्रत्यंग
पहाटेच्या प्रशांत प्रहरीं
सिंधु पुलिनावरील स्वच्छंद समीरणांनें
चुंबल्यागत.
पण ज्याच्यासाठी आज सारें जग
मृगांभाचा पाठलाग करणाऱ्या पिसाट हरिणी प्रमाणे
आसुसलें आहे
तो हा माझ्या हातांतला
स्वर्गीय सुखसुधेचा स्वर्णिय कुंभ
नाही लाभला मला
अवचित, अकस्मात, अचानक
अल्लाउद्दिनाच्या जादूच्या दिव्याने निर्मिलेल्या
राज प्रासादासारखा.
होतों मीहि एकदा तुमच्याचप्रमाणे
स्वप्नांची शिदोरी आणि आकांक्षांच्या पावड्या घेऊन
सुखाच्या शोधासाठी
अनिरुद्ध भ्रमण करीत.
दिक्कालाची तमा न बाळगतां
माझी भिरभिरती नजर
जिथे जिथे पोंचली तिथे तिथे
शोधून बघितलें;
आणि केला उपसा या विश्ववापिकेचा
माझ्या पार्थिव देहांतला कण न् कण
पिचून निघेपर्यंत.
पण प्यायला आहे का कधी कुणी महाभाग
कोरड्या विहिरींतलें गोड पाणी !
केलें आहे का कुणी अमावास्येला
हिमांशूच्या रजतरश्मींशी प्रसन्न हितगूज !
हळू हळू
अखंड वाट चालीने
जीर्ण शीर्ण झालेल्या
माझ्या तकलुपी शरीराच्या छाताडावर

अनुक्रमणिका

यौवनांतले रंगेल मनसुबे
घडाघड कोसळून पडले
जानकीच्या अभिलाषेने
शिवधनुष्य उचलणाऱ्या रावणागत
नि मग सारंच संपलं—
उल्हास, भावना, आशा, संवेदना;
उरली फक्त अस्थिचर्माची निर्विकार जुळणी
उरांत कुठेतरी असहाय धुगधुगी बाळगून.
त्या संज्ञाहीनतेच्या कबरींत पुरलेलें
माझें जिवंत मढें बघून
हंसत हंसत
लांब लांब पावलें टाकीत
काळ निघून गेला
कनवटीस खोचून संवत्सराच्या थैल्यां
बेदरकार भांडवलदारागत.
त्यानंतर केव्हातरी
एका अकल्पितक्षणीं
माझ्या कानांच्या विषण्ण पाकळ्या
कसल्याशा अंतर्भेदी ध्वनीच्या गुंजनाने
थरकून उठल्या,
आणि आपुल्या शुष्क जिव्हांनी
टिपून घेऊं लागल्या
त्या स्वरलहरींतील शब्दांचे दंवबिंदु.
" कशाला भिजवितोस रे हतभाग्या,
शत शतकांच्या उपेक्षित आसवांनी
तुझ्या या पापण्या ?
अन् कशाला जाळतोस तुझें निराश हृदय
एकलेपणाच्या असह्य आगींत ?
आतां संपला तुझा एकाकी वनवास
सेंट हेलिनांतला.
बघ आलों आहें मी
दुःखाची अभिधा धारण करून
तुझ्या करपलेल्या कायेवर
मायेची पांखर घालाया.
बघूं नकोस परि असल्या शंकाकुल लोचनांनी
दुधाने तोंड पोळल्यावर
ताकहि फुंकून पिणाऱ्या बालका सारखा
माझ्या तळहातींच्या
या सौहार्द सुमनांच्या उपायनाकडे.
अरे, मीच दिधला होता धीर
त्या एकाकिनी दमयंतीला

जेव्हा तिच्या जिवाचा जिवलग
निषधाधिपति नलराज
ती गाढ झोंपल्याची संधि साधून
अर्धवस्त्रानिशीं एकटाच चालता झाला.
म्हणून सांगतों, विश्वास असूं दे,
नाही अंतरणार कालत्रयींहि
माझ्या मैत्रीचा ऊबदार स्पर्श
अलम दुनियेने जरी मांडली असली
तुझ्याशीं दुष्ट दावेदारी.
कारण अपेक्षेपेक्षा करूणेंतच असते
चिरंतन प्रीतीचें जननस्थान
आता तिळहि नाही ढाळायचें नीर
हसायचें परि प्रसन्न हास्य
आणि गायचें मन मुराद
सुखाचें हृदयंगम गीत
जखमी चंडोल आणि फुटलेले पडघम
साथीला घेऊन."
त्या शब्दसंहितेचें श्रवण करितां करितां
माझें मरणोन्मुख मन
खडबडून जागे झालें;
आणि नाचूं लागला अंतर्यामांत
उन्मत्त आनंद
चाखला असेल जो
बंगालच्या दुष्काळांतल्या हाडांच्या सांपळयाने
उकिरड्यावर गवसतां
कुजल्या भाताचा वीतभर डोंगर.
तेव्हापासून स्वीकारलें आहे मीं
दुःखाचें मित्रत्व;
समरसून गेलों आहें मी
त्याच्या भावभावनांशी
उभ्या जगाला उपहसत
त्याच्या उघड्या वक्षभांत मान खुपसून
गुजगोष्टी करितां करितां
माझ्या सुखसागराला उधाण भरती येते,
नी गुणगुणूं लागतों मी
तिच्या लाटांच्या हिंदोळयावर डुलत डुलत
वैफल्याची सुखद विलापिका—
"अशीच राहो रात काजळी
काळोखाच्या मारत मिटक्या
असाच राहो मीहि युगयुग
धूलिकणांच्या चाटत जिभल्या !"

—वसन्त निनावे

अनुक्रमणिका

पिउनी धुटका

पिउनी धुटका श्वेतदंवाचा दाणे भरल्या शेतावरचा
हसरी ताजी हरित टवटवी भरभर चढुनी चढणीवरती
जिथेच मिळते धुक्यांत लपल्या निळ्या मनाच्या लालडोंगरां
तिथेच फिरतें मनही माझें डंवरून गेलें पहाटेपासुन
भिर भिर फिरतें पवनासंगें वेचुन दरवळ स्वर्णित ओली
बाभुळवनच्या पीतसुमांची नवनवतीची गंमत असली.
प्रकाश–वर्तुळ बालार्काचें झिरपत येतां अतीनीलता
पंख पसरुनी गरुड जणूं कीं घिरघिरतें मन असंख्य घिरट्या.
मधेंच श्रोता बनुन ऐकतें सुरांगि गाणें ओहोळाचें
गिरकी घेउन मोठा लुपका अती नीलकर चोंचित भरतें
भरते वांछा पंखीं त्याच्या
हिंडावें अन् घरांघरांतुन
वाटित वाणें तेजमयाची
अती नील त्या तेजमयाची !

—य. द. भावे

★

मनांत हसते उंच हवेली.

महागाईचे पिवळे डोळे,
केस रेशमी, सुकलेले स्तन,
उंच मान अन् टंच पोटऱ्या,
नाण्यांनी भरलेले खोचण !
स्वस्ताई ही मवाळ, दांभिक,
शिळ्या दिलाची आणिक वंध्या;
नजर टाचकी, बोजड कंबर,
शरिरावरती निव्वळ चिंध्या !
तीही अगतिक; ही ही अगतिक;
नपुंसकांच्या ह्यातर रांडा ....
उंच हवेली जवळुन जाई
बुभुक्षितांचा भयाण तांडा.
बुभुक्षितांचा भयाण तांडा,
भीक मागतो दोन्हीं वेळीं.
—टांकसाळ ती मनांत हसते !
मनात हसते उंच हवेली !

—विंदा करंदीकर

शेला

(ग्रंथ परीक्षण)

श्रीमती इंदिराबाई संत यांच्या स्फुट कवितांचा हा संग्रह आहे. या संग्रहाच्या वेष्टनावर मुद्रित केलेल्या संक्षिप्त मजकुरांत या कवितांचें स्वरूप उत्तम तऱ्हेने वर्णिलें आहे. तो या संग्रहावरचा उत्कृष्ट अभिप्राय आहे. या संग्रहांत निम्म्याहून जास्त विरहगीतें आहेत. सुविज्ञ व कलाभिज्ञ पतीच्या निधनानंतर श्रीमती इंदिराबाईंनी आपल्या मनांतल्या साऱ्या भावना व्यक्त करण्यासाठी कवितेचा आश्रय घेतला असावा. आपल्या व्याकुळतेला, विकलतेला, अशरणतेला व्यक्त करण्यासाठी त्यांनी कवितेचा सहवास पसंत केला. तिच्या सान्निध्यांत त्यांचें व्यथित मन आपल्या रम्य स्मृति सांगूं लागलें. इंदिराबाईंच्या काव्याचें स्वरूप यावरून स्पष्ट होईल. त्यांची कविता स्वयंनिविष्ट वृत्तीची आहे. आपलीं मुलें व प्रिय सख्याची स्मृति या परिमित विषयांतच त्यांचें मन घोंटाळत असल्याने यांच्या काव्यांत आत्मनिष्ठा कमालीची भरून राहिली आहे. केव्हा केव्हा त्यांना वाटतें—

माझें सुख माझें दुःख । लाडके हे माझे भाव
काय त्यांचेंच कौतुक । कोठवरी त्यांना वाव
कां न जाणे पराचिये । अंतरींचें सुख दुःख
कांसया हें मन आतां । राहूं पाहे अंतर्मुख

परंतु हा विचार क्षणिक ठरतो आणि पुन्हां त्या आपल्या प्रियकराच्या मुग्ध आठवणींत गूंगून जातात. या भावगीतांत एकांगीपणा आला आहे. त्याचें कारण विरह हा एकच भाव त्यांत पुनः पुनः आला आहे. वात्सल्याच्या भावनेत त्या स्वतःच्या मुलांचें कौतुक वर्णन करतील. मातृहृदय व्यक्त करतील. क्वचित मातृप्रेमहि वर्णन करतील परंतु पतीच्या स्मृतींची जाणीव झाली की, विरह भावनेचा करुण आविष्कार करूं लागतील. यांतच त्यांचें कविमन रंगतें. त्यांची सर्वच विरहगीतें शुद्ध व ऋजु स्वरूपाची आहेत. 'आंसवें' 'कातरवेळेला' 'झंझावात' 'उत्फुल्ल पीत हें' 'अडखळे' 'अवचित !' 'अजूनीहि' या कवितांत विरहाचें मुग्ध पडसाद आहेत, विरहाची ग्लानि आहे. वल्लभाच्या 'सहवास' कालीन मधुर स्मृतींचा हळुवार व करुण आविष्कार आहे.

या संग्रहांत वत्सलरसाची सुंदर कविताहि समाविष्ट झाली आहे. 'चाहूल' 'येरे येरे' 'बाळ होता रंगला' 'गाई गाई' या गीतांतून मातृहृदय व्यक्त झालें आहे. इंदिराबाईंनी कांही निसर्गगीतेंहि लिहिलीं आहेत. त्यांच्या ठिकाणीं निसर्गाचे उत्कट प्रेम आहे. निसर्गाच्या विशाल जीवनाचें विशेषतः सागराच्या भव्य गर्जिताचें त्यांना फार आकर्षण आहे. त्यांच्या चिरव्यथित अंतःकरणाला सागराच्या घोषिताची कमालीची ओढ आहे. 'सागरा' व 'समर्पण' या कविता सुंदर आहेत.

निसर्गप्रेमाची व वत्सलतेची कांही कविता जरी त्यांनी लिहिली असली तरी त्यांच्या कवितेंत—

'अंतरींच्या अंतरांत हृदयाच्या गाभाऱ्यांत
जीवसख्याची नजर, तेवते शांत शांत

अथवा

तुजवीण आतां तुझ्या या संसारी । अंगाराच्या सरी, वर्षतात
आंत बाहेरून लागलीसे आग । तुझा घेत माग येऊं कोठें ?

हे ' विरहोच्छ्वास ' अधिक आहेत आणि त्यांत वावगें कांही नाही.

—पां. व. गाडगीळ.

संघवार्ता

सन्मान्य पाहुण्यांच्या भेटी

(१) ता. १३ मार्च १९५२ रोजी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे एक कार्यकर्ते पुण्याचे प्रसिद्ध लेखक प्रा. रा. शं. वाळिंबे यांनी वि. सा. संघाला भेट दिली.

(२) दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचे प्रमुख कार्यकर्ते सांगलीचे प्रा. गं. गो. कानिटकर आणि इंदूरच्या महाराष्ट्र साहित्य सभेचे प्रमुख कार्यकर्ते व कौंसिल ऑफ स्टेटचे मध्य भारतीय सदस्य श्री. वि. सी. सरवटे यांनी ता. २२ मार्च रोजीं कार्यालयाला भेट दिली व आपल्या विशिष्ट भागांतील भाषिक परिस्थितीचें समालोचन करून वि. सा. संघाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केलें.

मंदिर निधीला देणगी

(१) परमश्रेष्ठ राज्यपाल नामदार मंगलदास पक्वासा यांनी ता. २९ मार्च रोजीं विदर्भ साहित्य संघाला दोनशे रुपयांची रोख देणगी देऊन त्याच्या कार्याला सुयश चिंतिलें. नामदार पक्वासा हे नाट्योत्सवाला उपस्थित होते. त्याच वेळी त्यांची ही उदार देणगी जाहीर करण्यांत आली. त्यांच्या या देणगीबद्दल वि. सा. संघ अत्यंत ऋणी आहे.

(२) नागपूर येथील सुविद्य भगिनी सौ. शांताबाई जोशी यांनी आपल्या दिवंगत मातोश्री कै. वा. गं. भा. इंदिराबाई उर्फ जिजीबाई देशपांडे, बुलढाणा, यांच्या स्मरणार्थ मंदिर निधीला ३१ रुपयांची रोख देणगी ता. २६ मार्च रोजी वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर दिली. संघ त्यांचा आभारी आहे.

(३) प्रा. गं. गो. कानेटकर यांनी ता. २२ मार्च रोजीं कार्यालयांत झालेल्या त्यांच्या सत्काराच्या वेळी रुपये शंभरची रोख देणगी दिली. तिचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें आवश्यक आहे.

(४) वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष प्रा. डॉ. मा. गो. देशमुख यांनी वि. सा. संघाचे एक संस्थापक, विदर्भाचे थोर नेते आणि 'त्यांना व्यक्तिश: पितृतुल्य असलेले' लो. ना. बापुजी अणे यांचें एक उचित तैलचित्र वि. सा. मंदिरांत प्रमुख जागीं लावण्याच्या खर्चासाठी देणगीचा पहिला हप्ता म्हणून रु. ३० दिले आहेत. या त्यांच्या विशिष्ट देणगीबद्दल वि. सा. संघ त्यांचा आभारी आहे.

नव्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक

विदर्भ साहित्य संघाच्या १९५२ सालच्या नव्या कार्यकारी मंडळाची सभा ता. १३ एप्रिल १९५२ रोजीं सकाळीं ८॥ वाजतां नागपूर येथे कार्यालयांत नवे अध्यक्ष प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. प्रथम, डॉ. पेंडसे यांनी, घटनेने अध्यक्षांना दिलेल्या अधिकारानुसार, (१) प्रा. डॉ. वि. भि. कोलते आणि (२) प्रा. वा. कृ. चोरघडे यांची कार्यकारी मंडळावर केलेली नियुक्ति जाहीर करण्यांत आली. त्यानंतर पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकी पुढीलप्रमाणे सर्वानुमतें झाल्या:—

उपाध्यक्ष—श्री. पु. य. देशपांडे
कोषाध्यक्ष—सौ. कुसुमावतीबाई देशपांडे

सरचिटणीस—श्री. ह. ना. नेने
चिटणीस—,, ना. रा. शेंडे (नागपूर)
,, वा. ना. सहस्रबुद्धे (गोंदिया)
,, के. दे. देशपांडे (अमरावती)
संचालक, परीक्षासमिति—डॉ. वि. भि. कोलते
संपादक, युगवाणी—प्रा. वा. कृ. चोरघडे

यानंतर डॉ. पेंडसे यांनी जुन्या कार्यकारी मंडळासंबंधी पुढील ठराव मांडलाः—

"गेल्या वर्षाच्या कार्यकारी मंडळाने वि. सा. संघाची परिश्रमपूर्वक जी अभिनंदनीय सेवा केली, ती लक्षांत घेऊन नवें कार्यकारी मंडळ या निवृत्त होणाऱ्या कार्यकारी मंडळाचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतें."

हा ठराव सर्वानुमतें मंजूर झाला.

मंदिरनिधिसाठी नवी समिति

यानंतर प्रा. डॉ. वि. भि. कोलते यांनी पुढील ठराव मांडला.

" विदर्भ साहित्य संघाचें विदर्भ साहित्यमंदिर बांधण्यासाठी निधि उभारण्याच्या कामाकरितां चांदा येथील अधिवेशनांत जी समिति नेमण्यांत आली होती, त्या समितीची पुनर्रचना पुढीलप्रमाणे करण्यांत येत आहे—

अध्यक्ष—न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति
संयोजनमंत्री— श्री. बाबुराव चिमोटे
संयुक्त कार्यवाह—श्री. ना. गो. ओगले
,, रा. पु. सगदेव
,, गं. त्र्यं. माडखोलकर
सदस्य— श्री. पु. य. देशपांडे
,, बाळासाहेब ढवळे

वि. सा. संघाचे अध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि सरचिटणीस हे अधिकारपरत्वें या समितीचे सदस्य राहतील व या समितीला जरूर तितके सदस्य स्वीकृत करून घेण्याचा अधिकार राहील. ही समिति संघाध्यक्षांच्या सल्ल्याने अवश्य ते सर्व उपाय योजून निधि गोळा करण्याचें काम करील.

ही समिति जो निधि गोळा करील, त्याचा विनियोग मंदिरउभारणीच्या कार्याशिवाय अन्य कोणत्याहि कामासाठी करण्यांत येणार नाही. मंदिरनिधीच्या चालू खात्यांत हा निधी जमा करण्यांत येईल व त्याची व्यवस्था आणि व्यवहार करण्याचे अधिकार वि. सा. संघाच्या कोषाध्यक्षांकडे राहतील."

या ठरावाला श्री. पु. य. देशपांडे यांनी अनुमोदन दिल्यावर तो सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला.

कार्यकारी मंडळाची सभा

वि. सा. संघाच्या का. का. मंडळाची सभा रविवार ता. १३ एप्रिल रोजीं सकाळीं ९ वाजतां नागपूर येथे कार्यालयांत संघाध्यक्ष सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या सभेला नव्या वर्षाचे अध्यक्ष प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे, नव्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आणि श्री. आ. रा. देशपांडे व प्रा. डॉ. मा. गो. देशमुख हे विशेष निमंत्रणाने हजर होते.

अनुक्रमणिका

संघवार्ता

सन्मान्य पाहुण्यांच्या भेटी

(१) ता. १३ मार्च १९५२ रोजी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे एक कार्यकर्ते पुण्याचे प्रसिद्ध लेखक प्रा. रा. शं. वाळिंबे यांनी वि. सा. संघाला भेट दिली.

(२) दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचे प्रमुख कार्यकर्ते सांगलीचे प्रा. गं. गो. कानेटकर आणि इंदूरच्या महाराष्ट्र साहित्य सभेचे प्रमुख कार्यकर्ते व कौंसिल ऑफ स्टेटचे मध्य भारतीय सदस्य श्री. वि. सी. सरवटे यांनी ता. २२ मार्च रोजीं कार्यालयाला भेट दिली व आपल्या विशिष्ट भागांतील भाषिक परिस्थितीचें समालोचन करून वि. सा. संघाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केलें.

मंदिर निधीला देणगी

(१) परमश्रेष्ठ राज्यपाल नामदार मंगलदास पक्वासा यांनी ता. २९ मार्च रोजीं विदर्भ साहित्य संघाला दोनशे रुपयांची रोख देणगी देऊन त्याच्या कार्याला सुयश चिंतिलें. नामदार पक्वासा हे नाट्योत्सवाला उपस्थित होते. त्याच वेळी त्यांची ही उदार देणगी जाहीर करण्यांत आली. त्यांच्या या देणगीबद्दल वि. सा. संघ अत्यंत ऋणी आहे.

(२) नागपूर येथील सुविद्य भगिनी सौ. शांताबाई जोशी यांनी आपल्या दिवंगत मातोश्री कै. वा. गं. भा. इंदिराबाई उर्फ जिजीबाई देशपांडे, बुलढाणा, यांच्या स्मरणार्थ मंदिर निधीला ३१ रुपयांची रोख देणगी ता. २६ मार्च रोजी वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर दिली. संघ त्यांचा आभारी आहे.

(३) प्रा. गं. गो. कानेटकर यांनी ता. २२ मार्च रोजीं कार्यालयांत झालेल्या त्यांच्या सत्काराच्या वेळी रुपये शंभरची रोख देणगी दिली. तिचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें आवश्यक आहे.

(४) वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष प्रा. डॉ. मा. गो. देशमुख यांनी वि. सा. संघाचे एक संस्थापक, विदर्भाचे थोर नेते आणि 'त्यांना व्यक्तिश: पितृतुल्य असलेले' लो. ना. बापुजी अणे यांचें एक उचित तैलचित्र वि. सा. मंदिरांत प्रमुख जागीं लावण्याच्या खर्चासाठी देणगीचा पहिला हप्ता म्हणून रु. ३० दिले आहेत. या त्यांच्या विशिष्ट देणगीबद्दल वि. सा. संघ त्यांचा आभारी आहे.

नव्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक

विदर्भ साहित्य संघाच्या १९५२ सालच्या नव्या कार्यकारी मंडळाची सभा ता. १३ एप्रिल १९५२ रोजीं सकाळीं ८॥ वाजतां नागपूर येथे कार्यालयांत नवे अध्यक्ष प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. प्रथम, डॉ. पेंडसे यांनी, घटनेने अध्यक्षांना दिलेल्या अधिकारानुसार, (१) प्रा. डॉ. वि. भि. कोलते आणि (२) प्रा. वा. कृ. चोरघडे यांची कार्यकारी मंडळावर केलेली नियुक्ति जाहीर करण्यांत आली. त्यानंतर पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकी पुढीलप्रमाणे सर्वानुमतें झाल्या:—

उपाध्यक्ष—श्री. पु. य. देशपांडे

कोषाध्यक्ष—सौ. कुसुमावतीबाई देशपांडे

सरचिटणीस—श्री. ह. ना. नेने
चिटणीस—,, ना. रा. शेंडे (नागपूर)
,, वा. ना. सहस्रबुद्धे (गोंदिया)
,, के. दे. देशपांडे (अमरावती)
संचालक, परीक्षासमिति—डॉ. वि. भि. कोलते
संपादक, युगवाणी—प्रा. वा. कृ. चोरघडे

यानंतर डॉ. पेंडसे यांनी जुन्या कार्यकारी मंडळासंबंधी पुढील ठराव मांडला:—

“गेल्या वर्षाच्या कार्यकारी मंडळाने वि. सा. संघाची परिश्रमपूर्वक जी अभिनंदनीय सेवा केली, ती लक्षांत घेऊन नवें कार्यकारी मंडळ या निवृत्त होणाऱ्या कार्यकारी मंडळाचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतें.”

हा ठराव सर्वानुमतें मंजूर झाला.

मंदिरनिधिसाठी नवी समिति

यानंतर प्रा. डॉ. वि. भि. कोलते यांनी पुढील ठराव मांडला.

“ विदर्भ साहित्य संघाचें विदर्भ साहित्यमंदिर बांधण्यासाठी निधि उभारण्याच्या कामाकरितां चांदा येथील अधिवेशनांत जो समिति नेमण्यांत आली होती, त्या समितीची पुनरचना पुढीलप्रमाणे करण्यांत येत आहे—

अध्यक्ष—न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति
संयोजनमंत्री— श्री. बाबुराव चिमोटे
संयुक्त कार्यवाह-श्री. ना. गो. ओगले
,, रा. पु. सगदेव
,, गं. त्र्यं. माडखोलकर
सदस्य— श्री. पु. य. देशपांडे
,, बाळासाहेब ढवळे

वि. सा. संघाचे अध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि सरचिटणीस हे अधिकारपरत्वें या समितीचे सदस्य राहतील व या समितीला जरूर तितके सदस्य स्वीकृत करून घेण्याचा अधिकार राहील. ही समिति संघाध्यक्षांच्या सल्ल्याने अवश्य ते सर्व उपाय योजून निधि गोळा करण्याचें काम करील.

ही समिति जो निधि गोळा करील, त्याचा विनियोग मंदिरउभारणीच्या कार्याशिवाय अन्य कोणत्याहि कामासाठी करण्यांत येणार नाही. मंदिरनिधीच्या चालू खात्यांत हा निधी जमा करण्यांत येईल व त्याची व्यवस्था आणि व्यवहार करण्याचे अधिकार वि. सा. संघाच्या कोषाध्यक्षांकडे राहतील.”

या ठरावाला श्री. पु. य. देशपांडे यांनी अनुमोदन दिल्यावर तो सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला.

कार्यकारी मंडळाची सभा

वि. सा. संघाच्या का. का. मंडळाची सभा रविवार ता. १३ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजतां नागपूर येथे कार्यालयांत संघाध्यक्ष सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या सभेला नव्या वर्षाचे अध्यक्ष प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे, नव्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आणि श्री. आ. रा. देशपांडे व प्रा. डॉ. मा. गो. देशमुख हे विशेष निमंत्रणाने हजर होते.

सभेंत पुढील कामकाज झालें—

(१) प्रथम ता. २०-१-५२ आणि ता २७-१-५२ रोजी भरलेल्या का. मंडळाच्या सभांचें प्रतिवृत्त वाचून दाखवून तें मंजूर करण्यांत आलें. ता. २७-१-५२ च्या सभेला श्री. ना. क. तांशी हे हाजर नसल्यामुळे ते तटस्थ राहिले.

(२) हिशेबाचा तक्ता ऑडिटर याच्याकडून वेळेवर तपासून न आल्यामुळे तो कार्यकारी मंडळाच्या जबलपूर येथील सभेपुढे ठेवण्याचें ठरलें.

(३) जबलपूर येथे भरणार असलेल्या वि. सा. संघाच्या चौदाव्या अधिवेशनाचा स्वागत मंडळाकडून तयार होऊन आलेला कार्यक्रम वाचून दाखविण्यांत आला.

(४) डॉ. मा. गो. देशमुख यांनी बिहारचे राज्यपाल लोकनायक मा. श्री. अणे यांचें तैलचित्र वि. सा. संघाच्या सभागृहांत लावण्यासाठी रुपये तीसची जी देणगी ह्या तैल चित्राच्या संपूर्ण खर्चाचा पहिला हप्ता म्हणून दिली ती आभार पूर्वक स्वीकारण्यांत आली, व त्यांच्या तैलचित्रासंबंधीच्या योजनेला संमती देण्यांत आली.

(५) सुमन संचय, मराठी गद्य व निबंध परिमल यांच्या नवीन आवृत्तींच्या छपाईसाठी निवेदा मागविण्यांत याव्या असें ठरलें. या पुस्तकांच्या चालू आवृत्यांपैकी सुमन संचय व निबंध परिमलच्या पुस्तकांचे पूर्ण पैसे मिळाले असल्याचे व मराठी गद्याच्या संपूर्ण आवृत्तीची रकम जूनमध्यें देण्याचें प्रकाशक श्री. ज. भि. कोलते यांनी आश्वासन दिलें असल्याचें अध्यक्षांनी सांगितलें.

(६) वि. सा. संघाच्या अमरावती शाखेने तेरा सदस्यांना युगवाणी न मिळाल्याची तक्रार त्यांच्याकडून आल्यामुळे त्यांची वर्गणी परत केली असें शाखेकडून आलेल्या हिशेबाच्या तक्त्यांत नमूद करण्यांत आलेलें होतें. त्याचा विचार झाला. घटनेतील नियमानुसार सदस्यत्वाची वर्गणी परत करता येत नाही म्हणून या परत केलेल्या वर्गणीची पूर्ण रकम केंद्रीय कार्यालयाकडे पाठविण्याबद्दल अमरावती शाखेला आदेश देण्याचें ठरलें.

(७) अमरावती शाखेकडून युगवाणीसंबंधी आलेला ठराव नव्या कार्यकारी मंडळाने विचारांत घ्यावा असें ठरलें.

(८) हिंदी शिक्षा समितीवर वि. सा. संघातर्फे प्रतिनिधित्वासाठी दोन नांवें सुचविण्यासंबंधी मध्यप्रदेश सरकारच्या भाषा विभागाकडून आलेल्या पत्राचा विचार करण्यांत आला व श्री. पु. य. देशपांडे आणि श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची प्रतिनिधित्वासाठी गुप्त मतदान पद्धतीने निवड करण्यांत आली.

(९) न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति, डॉ. य. खु. देशपांडे व श्री. पु. य. देशपांडे यांच्या समितीने तयार केलेल्या विश्वस्त पत्राच्या मसुद्याचा विचार करण्यांत येऊन पुढील ठराव करण्यांत आला—

(अ) "कार्यकारी मंडळाची ही सभा असा ठराव करते की विश्वस्त पत्राच्या मसुद्याबाबत ज्या सूचना आल्या त्या सर्वांचा विचार होऊन पुढील दुरुस्त्यांसह मसुदा मान्य करण्यांत यावा.

दुरुस्त्या सोबतच्या मसुद्यांत श्री. पु. य. देशपांडे यांच्या स्वाक्षरीसह (Initials) ज्या दुरुस्त्या लिहिलेल्या आहेत त्या.

(आ) वर प्रमाणे दुरुस्त केलेल्या मसुद्यांत कायद्याच्या दृष्टीने जे फेरफार करणें आवश्यक होईल ते करण्याचा अधिकार ही सभा न्या. मू. के. तु. मंगलमूर्ति यांना देत आहे."

—रा. पु. सगदेव, चिटणीस, वि. सा. संघ

संपादकीय

गेलें संबंध वर्ष युगवाणीची स्थिति फार ओढाताणीची झाली. मासिक परवडेना म्हणून द्वैमासिकाचा मार्ग स्वीकारावा लागला. आमचा सगळा हिशोब वि. सा. सं. चे सभासद कमींत कमी १२०० होतील या आशेवर आधारलेला होता.

युगवाणीचें अंतरंग देखील आमच्या मनासारखें झालें नाही. युगवाणी परवडत नाही ही वस्तुस्थिति आणि हा गाडा धकावण्याची कितिहि शिकस्त केली तरी खड्डे टाळता टाळता नाकी नऊ येतात हा अनुभव.

गेल्या वर्षी संपादन कार्याची धुरा कुणातरी समर्थ व्यक्तीच्या खांद्यावर बसावी अशी मीं व्यक्तिशः मनापासून अपेक्षा केली होती. आधि, व्याधि, उपाधींच्या आडवेंग्यांनी माझ्या मनाचे कोणतेहि संकल्प गेल्या संबंध वर्षांत मला पुरे करतां आले नाहीत. आपलें काम आपल्याने संभाळून होत नाही म्हणून मी त्यांतून मुक्त होण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. तो सिद्धीस गेला नाही. हर्ष-खेदांनी अभिभूत होण्यालायक मन आतां मजजवळ राहिलें नसलें तरी नवी जबाबदारी मला झेपेल किंवा नाही अशी भीति वाटण्याइतकें तें कमजोर मात्र झालें आहे. प्रस्तुतचा अंक सोडला तर युगवाणीचे गेले कित्येक अंक माझ्या सहकाऱ्यांनाच संभाळावे लागले. दैनंदिन कामेंहि नियमित झालीं नाहीत. अर्थात जे दोष घडले व ज्या चुका राहिल्या त्याची जबाबदारी माझ्यावरच आहे. **सर्वांत महत्त्वाची चूक म्हणजे वि. सा. सं. च्या वर्ष पद्धतीप्रमाणे युगवाणीचे गेल्या जानेवारीपासून सातवें वर्ष सुरू झालें असून तसें दुरुस्त करण्याच राहून गेलें ही होय. हा नव्या म्हणजे सातव्या वर्षाचा दुसरा अंक आहे.**

यंदाचें वि. सा. सं. चें अधिवेशन जबलपूरला व्हावयाचें आहे. त्याचीं वैशिष्ट्यें या अंकांत प्रा. रानडे यांनी ग्रथित केलीं आहेत. माझ्या दृष्टीने त्याचें वैशिष्ट्य म्हणजे घटना दुरुस्त होऊन पास व्हावयाची आणि संघाच्या कारभाराला सुसूत्रता लाभावयाची हें होय. युगवाणी केवळ नाइलाजाने द्वैमासिक करावें लागलें. सभासद जर मनावर घेतील तर युगवाणी पुनः मासिक स्वरूपांत निघूं शकेल. तें जबलपूरच्या संमेलनप्रसंगी घडून आलें तर मला अपरिमित आनंद होईल.

माझ्या अगतिकतेचा उल्लेख मीं वर केला आहे. माझा आनंदहि थोडा व्यक्त करतों. यंदा जबलपूरला प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे अध्यक्षस्थानावरून भाषण करतील. त्यांनी संघासाठी जें केलें त्याचें परिमार्जन केवळ शब्दांनी होणें शक्य नाही. मी त्यांचा विद्यार्थी. त्यांनी तें नातें आजतागायत निभविलें आणि आपल्या संयम व सौजन्यपूर्ण वागणुकीने आम्हा धाकल्यांच्या हृदयांतलें आपलें स्थान अढळ केलें. त्यांचा गौरव जबलपूरला होत असल्याने माझें मन आनंदाने प्रफुल्लित झालें आहे.

दुसरे, आमचे बाबासाहेब म्हणजे संघाचे उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे सांस्कृतिक संमेलना-साठी पॅरिसला जात आहेत. आम्ही लहान होतों तेव्हा बाबा मोठे होते आणि आम्ही मोठे झाल्यावर त्यांचें थोरपण आणखीच मोठें वाटलें. दोन द्यावे, दोन घ्यावे. रागवावें रुसावें, पण अंतःकरण जान्हवीच्या पाण्यांत धुतलेल्या वस्त्रागत निर्मळ ठेवावें, हा बाबांचा पहिल्यापासूनचा खाक्या ! जें काय भलें बुरें करतील तें सगळें मनापासून. याला जें फार मोठें संस्कारी मन लागतें तें त्यांच्या जवळ आहे. असा हा दिलदार माणूस पॅरिसला जात आहे आणि आमचा माणूस जात आहे म्हणूनहि मनांत आनंद दाटला आहे. बाबा, तुमचा प्रवास खूप मजेचा व सुखाचा होवो.

यंदा नर्मदेच्या तीरावर मराठमोळ्याचा हा मेळावा भरावयाचा आहे. अविरत खळखळ, अखंड धार आणि अगाध जलाशय हें या लोकमातेचें वैशिष्ट्य. तिच्या सान्निध्यांत आमचीं मनें, आमचे संकल्प, आमच्या आशा, मनोरथ ताजेतवाने होतील. मराठी आमुची मायबोली आमच्या हिंदी देशबोलीशीं हितगुज करील. जें चांगलें असेल तें घेऊं, जें वाईट असेल तें टाकून देऊं. भाषाप्रेमाला अंत नाही. आईपेक्षांहि अधिक प्रेम भाषा करीत असते. तिची कदर, तिचें संवर्धन, तिची अखंड प्रगति साधण्यासाठी या जबलपूरच्या सोहळ्यांत आम्हांला स्फूर्ति लाभो.

मी देखील संपादकाची जबाबदारी पार पाडण्यासाठी अशा प्रकारच्या स्फूर्तिकणांची आशा करीत आहे. गेल्यावर्षीच्या माझ्या प्रमादांबद्दल क्षमेची याचना. यंदाच्या वर्षासाठी प्रेमाची व सहकार्याची अपेक्षा. मजवर सभासदांनी आजवर निरपेक्ष लोभ ठेवला. मी त्याच्या मोबदल्यांत कांही देऊं शकलों नाही. पण मी कृतघ्न नाही. माझ्या मनांतील कृतज्ञता मी कधीतरी साकार करून दाखवीन, नक्की दाखवीन !

—वामन चोरघडे

अनुक्रमणिका

" युगवाणी " (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्यांकडून लायब्ऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें
विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

यु ग वा णी

द्वैमासिक, एप्रिल १९५२
जबलपूर संमेलन अंक

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना विनामूल्य :: सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमाने सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपाने अधिक धडाडीने करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटाने चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

मुद्रक : प. वि. बेलखलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.